महाराष्ट्र विधानपरिषद

चौथे (हिवाळी) अधिवेशन, २०२०

अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

प्रश्नांची एकूण संख्या - ५०

औरंगाबाद सार्वजनिक बांधकाम विभागाचे कोट्यवधीचा निधी शासनाकडे थकीत असल्याबाबत

(१) ७८२ (१८-०३-२०२०). श्री.अंबादास दानवे : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत प्रत्येक अर्थसंकल्पात ०३-०४ या लेखाशिर्षांतर्गत रस्ते दुरुस्ती, मजबुतीकरण, खड्डे भरणे याकरीता शासनाकडून निधी दिला जातो, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, औरंगाबाद जिल्ह्यातील रु.७० कोटीचा निधी थकीत असल्याने अनेक ठिकाणी कंत्राटदारांनी काम बंद केल्याचे माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.अशोकराव चव्हाण (११-१२-२०२०) : (१) होय, खरे आहे, ५०५४ (०३) व (०४) व ३०५४ या लेखाशिर्षांतर्गत रस्ते दुरुस्ती व परिरक्षण, मजबुतीकरण या कामांकरीता निधी उपलब्ध करुन दिला जातो.

(२), (३) व (४) अंशत: खरे आहे, औरंगाबाद जिल्ह्यातील रस्ते दुरुस्ती, मजबुतीकरण व खड्डे भरणे याकरीता जिल्ह्यातील कंत्राटदारांनी केलेल्या कामांची थकीत देयके अदा करण्याकरीता विभागामार्फत माहे नोव्हेंबर, २०२० अखेर योजनेत्तर योजनेमधुन रुपये १२.३५ कोटी व योजनांतर्गत योजनेमधून राज्य मार्ग व प्रमुख जिल्हा मार्ग अंतर्गतच्या चालू कामांकरीता एकूण रुपये ४६.०१ कोटी असा एकूण रुपये ५८.३६ कोटी इतका निधी दिनांक २१/०८/२०२० व दिनांक १३/११/२०२० रोजीच्या शासन ज्ञापनान्वये औरंगाबाद जिल्ह्याकरीता अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, औरंगाबाद यांना वितरित केला आहे.

ठाणे येथील येऊरच्या जंगल परिसरात मद्याच्या व कोल्ड्रिंक्सच्या बाटल्या नाल्यांमध्ये आढळून आल्याबाबत

(२) १९३५ (१८-०३-२०२०). श्री.महादेव जानकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.नागोराव गाणार, डॉ.परिणय फुके, श्री.प्रसाद लाड : सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे येथील येऊरच्या जंगल परिसराला इको सेन्सिटिव्ह झोन म्हणून घोषित करण्यात आल्यानंतरही या परिसरात असणाऱ्या हॉटेल, फार्म हाऊस, ढाब्यावर दिनांक ३१ डिसेंबर, २०१९ रोजी अवैधरित्या पार्टयां करुन मद्याच्या, कोल्ड्रिंक्सच्या बाटल्या आसपासच्या परिसरात असणाऱ्या नाल्यांमध्ये आढळून आल्याची बाब दिनांक २ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वन विभाग, पालिका प्रशासन आणि पोलीस प्रशासन यांना सदर बाब माहिती असून सुध्दा यावर कोणतीही कारवाई झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, येऊरमध्ये अनधिकृत ढाबे, हॉटेल्स आणि हुक्का पार्लर किती प्रमाणात कार्यरत असून सदरील हॉटेल मालकांना नोटीस देवून प्रशासनाने आतापर्यंत कोणती कारवाई केली तसेच येऊरमधील वन्यजीवांचे रक्षण करण्यासाठी वन प्रशासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.संजय राठोड (०८-१२-२०२०) : (१) व (२) हे खरे नाही.

येऊर येथील पर्यावरण संवेदनशील क्षेत्रातील खाजगी क्षेत्रात दारुच्या बाटल्या असल्याची बाब दिनांक ०४/०३/२०२० रोजी निदर्शनास आली आहे. त्यानुसार अवैध दारु विक्री थांबविण्याबाबत वनक्षेत्रपाल येऊर यांचेव्दारे पोलीस निरीक्षक, वर्तकनगर पोलीस स्टेशन व उपायुक्त, राज्य उत्पादन शुल्क, ठाणे विभाग यांना कळविण्यात आले आहे.

(३) येऊर गावाचे क्षेत्र हे ठाणे महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील असून तेथील हॉटेल्स, टर्फ इत्यादी प्रकारच्या व्यवसायांकरीता महानगरपालिकेकडून परवानगी देण्यात येते. सदर व्यवसायिकांनी पर्यावरण संरक्षण अधिनियम, १९८६ मधील तरतूदींचा भंग केल्याची बाब वनक्षेत्रपाल, येऊर यांनी ठाणे महानगरपालिकेच्या निदर्शनास आणून दिलेली आहे. तसेच याबाबत वनक्षेत्रपाल, येऊर यांनी त्यांचेस्तरावर संबंधित हॉटेल्स, टर्फ यांना नोटीस दिलेल्या आहेत.

संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या इको सेन्सीटीव्ह झोनमध्ये रंगोली टर्फ यांनी पर्यावरण संरक्षण अधिनियम, १९८६ चा भंग केल्याने त्यांच्या विरोधात वनगुन्हा नोंदविण्यात आला असून पुढील कार्यवाही सुरु आहे.

वन्यजीवांच्या व वन संरक्षणाच्या दृष्टीने येऊर वन परिक्षेत्रात वन कर्मचाऱ्यांमार्फत दिवस-रात्र नियमितपणे गस्त करण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

वाशिम नगरपालिका हद्दीतील शासकीय जमिनीवर वसतिगृहाचे अनधिकृत बांधकाम निष्कासित करण्याबाबत

(३) १९५४ (१८-०३-२०२०). श्री.विनायकराव मेटे : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशिम नगरपालिका हद्दीतील शिट क्र.२३, सर्व्हे नं.२७ (१०२८३ चौ.मी) शासकीय जमिनीवर अतिक्रमण करुन त्याठिकाणी वसतिगृहाचे अनधिकृत बांधकाम करुन शैक्षणिक संस्थेने अतिक्रमण केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गत २० वर्षात सदर अनधिकृत बांधकाम ताब्यात घेवून निष्कासित करण्याबाबत शासनाने कोणतीही कार्यवाही केलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार शासनाची जमीन ताब्यात घेवून दोषी अधिकारी व अतिक्रमण करणाऱ्या व्यक्तींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.बाळासाहेब थोरात (१०-१२-२०२०) : (१) होय, कसबे वाशिम भाग ३, ता. जि.वाशिम मधील नझुल शिट नं. २७, प्लॉट क्र. २३, क्षेत्रफळ १०२८१.०० चौ. मी. या शासकीय जागेवर प्राचार्य, राजस्थान आर्य कॉलेज, वाशिम यांनी अतिक्रमण करून सन २०१३ मध्ये वसतिगृहाचे बांधकाम केल्याचे निदर्शनास आले होते.

(२) हे खरे नाही. तहसिलदार, वाशिम यांनी महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ चे कलम ५० अन्वये तसेच शासन निर्णय, दिनांक १२/०७/२०११ मधील तरतुदीनुसार संबंधित संस्थेने विषयांकित जागेवर केलेले अतिक्रमण हटवून जागा शासनाच्या ताब्यात घेण्याबाबत दिनांक १९/०७/२०१४ रोजी आदेश पारीत केले आहेत.

(३) व (४) सदरहू प्रकरणी तहसिलदार, वाशिम यांनी दिनांक १९/०७/२०१४ रोजी पारीत केलेल्या आदेशास व्यथित होवून राजस्थान आर्य कॉलेज, वाशिम यांनी मा.दिवाणी न्यायालय (वरीष्ठ स्तर), वाशिम यांचेकडे दिवाणी दावा क्र. १६६/२०१४, दिनांक ३०/०७/२०१४ रोजी दाखल केलेला असून मा.दिवाणी न्यायालय (वरीष्ठ स्तर), वाशिम यांनी दिनांक १२/०३/२०१५ रोजी दाव्यासंदर्भात अंतिम निर्णय होईपर्यंत स्थगनादेश पारीत केलेला आहे. वाशिम नगरपालिका हद्दीतील शासकीय जागेत अतिक्रमण करून राजस्थान आर्य कॉलेज यांनी वसतिगृहाचे बांधकाम केलेबाबतचे प्रकरण सध्या मा.दिवाणी न्यायालयात न्यायप्रविष्ट आहे. मा.दिवाणी न्यायालयाच्या निर्देशाच्या अनुषंगाने या प्रकरणी पुढील कार्यवाही करण्याचे संकल्पित आहे.

सिंदी रेल्वे (ता.सेलू, जि.वर्धा) येथील अवैध गौण खनिज उत्खनन रोखण्याबाबत

(४) २९२१ (२९-०५-२०२०). श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.प्रशांत परिचारक : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) समृध्दी महामार्गाच्या बांधकामाकरीता सिंदी रेल्वे (ता.सेलू, जि.वर्धा) येथील शेतकऱ्यांच्या शेतजमिनीतून विनापरवानगी अवैधरित्या गौण खनिजाचे उत्खनन होत असल्याचे माहे मार्च, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अवैध गौण खनिज उत्खनन प्रकरणी मा.मुख्यमंत्री तसेच तहसिल कार्यालय व सिंदी रेल्वे पोलिसांकडे तक्रार करुनही कोणतीही कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन अवैध गौण खनिज उत्खनन रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.बाळासाहेब थोरात (०८-१२-२०२०) : (१) व (२) अशी बाब निदर्शनास आली नाही.

(३) वर्धा जिल्ह्यात समृध्दी महामार्गाच्या कामाकरीता करण्यात येत असलेल्या गौण खनिजाच्या उत्खननाची तपासणी करण्यासाठी उपविभागीय स्तरावर समितीचे गठन करण्यात आले असून सदर समितीमार्फत वेळोवेळी तपासणी करुन उचित कार्यवाही करण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईतील मालवणी पोलीस ठाण्यातील प्रतिबंधित क्षेत्रात नियमांचे उल्लंघन करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत

(५) ३८६६ (१५-०७-२०२०). डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील मालवणी पोलीस ठाण्यातील पोलीस अधिकारी व कर्मचारी यांनी परिसरात शारिरीक अंतर न ठेवता फिसिकल डिस्टन्सचे उल्लंघन करुन गुन्हेगारासोबत वाढदिवस साजरा केल्याचा प्रकार माहे जून, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मालवणी हा प्रतिबंधित क्षेत्र (कंटेनमेंट झोन) असूनही पोलीस अधिकाऱ्यांनी नियमाचे उल्लंघन केल्याप्रकरणी त्यांचेवर कारवाई करण्याची मागणी स्थानिकांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषी पोलीस अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.अनिल देशमुख (११-१२-२०२०) : (१) होय.

(२) नाही.

(३) या प्रकरणी अपर पोलीस आयुक्त, उत्तर प्रादेशिक विभाग, मुंबई यांच्या आदेशान्वये सहायक पोलीस आयुक्त, मालवणी विभाग, मुंबई यांनी चौकशी करुन सादर केलेल्या सविस्तर चौकशी अहवालाच्या आधारे सदर अधिकारी

यांचा कसुरी अहवाल अपर पोलीस आयुक्त, उत्तर प्रादेशिक विभाग, मुंबई यांना सादर करण्यात आला होता. प्रस्तुत प्रकरणी अपर पोलीस आयुक्त, उत्तर प्रादेशिक विभाग, मुंबई यांच्या दिनांक ३०/०७/२०२० रोजीच्या कार्यालयीन आदेशान्वये पोलीस उपनिरीक्षक ग्यानोबा गोविंद्र इंद्राळे व सहायक पोलीस निरीक्षक नंदकुमार कोळी यांना सक्त ताकीद ही शिक्षा देण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

सांगली जिल्ह्यातील गावांमध्ये महात्मा फुले शेतकरी कर्ज माफी योजनेमध्ये गैरव्यवहार झाल्याबाबत

(६) ४०१९ (१७-०७-२०२०). श्री.सदाशिव खोत, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.महादेव जानकर : सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कर्जाच्या विळख्यात अडकलेल्या शेतकऱ्यांना आर्थिक दिलासा देण्यासाठी शासनाने महात्मा फुले शेतकरी कर्ज माफी योजना आखली आणि त्या अंतर्गत शेतकरी कर्ज माफी झाली परंतु सांगली जिल्ह्यातील काही गावांमध्ये जमिनीचे क्षेत्र नसणाऱ्या लोकांनासुध्दा कर्ज पुरवठा केला गेला व कर्जमाफीच्या यादीमध्ये देखील त्यांचे नाव आल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, काही लोक शेतीशी निगडीत नसतानाही त्यांच्या खात्यात मोठ्या प्रमाणात रकमा जमा झाल्या आहेत त्यामुळे मोठा गैरव्यवहार झाल्याचा संशय व्यक्त होत असून अनेक तक्रारी जिल्हाधिकारी तसेच वरिष्ठ पातळीवर प्राप्त झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित दोषींविरुध्द कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (१०-१२-२०२०) : (१) व (२) होय.
(३) सांगली जिल्ह्यामध्ये महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्ज मुक्ती योजना २०१९ चा गैरलाभ घेतलेल्या प्रकरणापैकी १३ प्रकरणातील दोषींविरुध्द फौजदारी कार्यवाही करण्यात आलेली असून उर्वरीत प्रकरणी फौजदारी गुन्हे दाखल करण्याची कार्यवाही सुरू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

विदर्भ विकास वैधानिक महामंडळाचा कालावधी वाढवून देण्याबाबत

(७) ४१८८ (०९-०९-२०२०). डॉ.रणजित पाटील : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विदर्भातील ११ जिल्ह्यांकरीता विदर्भ विकास वैधानिक महामंडळाचा कालावधी वाढवून देण्याबाबतचे निवेदन लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री यांना दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.अजित पवार (११-१२-२०२०) : (१) होय.
(२) मंत्रिमंडळाच्या दिनांक २५ जून, २०२० रोजी मंत्रालय, मुंबई येथे झालेल्या बैठकीच्या अनुषंगाने सदर मंडळे पुनर्गठीत करण्याबाबत निर्णय घेण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

घाटपेढरी (ता.पारशिवनी, जि.नागपूर) येथील शिवारात वाघाच्या हल्यात शेतमजूराचा मृत्यू झाल्याबाबत

(८) ४७०३ (१४-०९-२०२०). श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.नागोराव गाणार, श्री.रामदास आंबटकर, श्री.प्रशांत परिचारक : सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) घाटपेढरी (ता.पारशिवनी, जि.नागपूर) येथील शिवरात वाघाच्या हल्ल्यात आदिवासी शेतमजूराचा मृत्यू झाल्याची बाब माहे एप्रिल, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मृत शेतमजूराच्या कुटुंबातील वारसांना शासनाने आर्थिक मदत केली आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर नरभक्षक वाघाचा वन विभागामार्फत बंदोबस्त करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.संजय राठोड (०८-१२-२०२०) : (१) हे खरे आहे.

सदर घटना घाटपेढरी (ता.पारशिवनी, जि.नागपूर) येथील गावशिवारात न घडता पेंच व्याघ्र प्रकल्पाच्या गाभा क्षेत्रातील पश्चिम पेंच वनक्षेत्रात घडली आहे.

(२) मृतक श्री.आनंदराव सुरण उईके, (वय ५१ वर्ष) रा.घाटपेढरी हे वन कर्मचाऱ्यांची नजर चुकवून पेंच व्याघ्र प्रकल्पाच्या गाभा क्षेत्रामध्ये अवैधरित्या मोहफुले गोळा करण्याकरीता गेले असता सदर घटना घडली आहे.

सदर घटनेमध्ये वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ च्या कलम २७, ३१ च्या तरतुदींचे उल्लंघन झाले आहे. त्यामुळे महसूल व वन विभाग शासन निर्णय, क्र.डब्ल्युएलपी-१००८/प्र.क्र.२७०/फ-१, दिनांक ०२/०७/२०१० मधील देय असलेल्या अर्थसहाय्याबाबतच्या अटी व शर्तीपैकी बाब क्र. १ चे स्पष्टपणे उल्लंघन झाल्यामुळे वन विभागाकडून सदर शेतमजूराच्या कुटुंबातील वारसांना आर्थिक मदत करण्यात आली नाही.

(३) सदर घटना ही मानवी चुकीमुळे घडली असून या क्षेत्रात यानंतर कोणतीही अशी घटना घडली नाही त्यामुळे वाघ नरभक्षक असल्याचा प्रश्न येत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

पेढरघोळ (ता.शहापूर, जि.ठाणे) येथील बॉटनिकल गार्डन नागरीकांसाठी खुले करण्याबाबत

(९) ४८२९ (२३-११-२०२०). श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अमोल मिटकरी, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी : सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील आदिवासी क्षेत्रातील मौजे पेढरघोळ जवळ सन २०१९ मध्ये जैवविविधता उद्यान (बॉटनिकल गार्डन) उभारण्यात आले असून त्यास स्व.उत्तमराव पाटील जैवविविधता केंद्र असे नाव देण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर उद्यानाच्या उभारणीसाठी रुपये ९० लाख खर्च करुन सन २०१९ मध्ये उद्यानाचे बांधकाम पूर्ण झाले असल्याचे दिनांक ३ सप्टेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले असून सदर उद्यानात १२ राशींच्या पंचागाकृती नक्षत्र वनाची उभारणी करण्यात येऊन पंचागातील राशी, नक्षत्र व चरणांचा समावेश केल्यामुळे अभ्यासकांच्या व पर्यटनाच्यादृष्टीने हे उद्यान महत्वाचे ठरणारे आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर उद्यानाचे बांधकाम दीड वर्षापूर्वी पूर्ण होऊन सामाजिक वनीकरण विभागाकडून वन विभागास हस्तांतरीत न केल्यामुळे उद्यान नागरिक, अभ्यासक व पर्यटकांसाठी खुले करण्यात आले नसल्याचेही दिनांक ३ सप्टेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर उद्यान नागरिकांसाठी खुले करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.संजय राठोड (१०-१२-२०२०) : (१) होय, मौजे पेंढरघोळ (जि.ठाणे) जवळ असलेले मौजे कानविंदे, (संरक्षित वन) ता.शहापूर, जि.ठाणे येथे सन २०१५-२०१६ ते २०१९-२०२० या कालावधीमध्ये जैवविविधता उद्यानाची निर्मिती करणेत आलेली आहे. सदर उद्यानातील कामांसाठी सन २०१८-२०१९

या कालावधीत रुपये ८९.८३ लाख खर्च करणेत आलेला असून सन २०१९-२०२० या कालावधीत ८.७७ लाख एवढा खर्च करणेत आलेला आहे. सदरचे काम मार्च, २०२० मध्ये पूर्ण झाले आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) या उद्यानातील कामे ही मार्च, २०२० अखेर पूर्ण झाली आहेत. परंतु कोविड-१९ विषाणूच्या प्रादुर्भावामुळे संपूर्ण देशभरात टाळेबंदी असल्यामुळे सदरहु उद्यान नागरिक, अभ्यासक व पर्यटकांसाठी खुले करण्यास शक्य झालेले नाही. टाळेबंदी संबंधात असलेली निर्बंध पूर्णत: शिथील केल्यानंतर उद्यान पर्यटकांसाठी खुले करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

लोकमान्य टिळक रुग्णालय, शीव, मुंबई येथे रक्ताचा गैरव्यवहार सुरु असल्याबाबत

(१०) ४९२० (१३-११-२०२०). श्री.विलास पोतनीस, डॉ.रणजित पाटील : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरोना साथीच्या काळात रक्तदान शिबिरे आणि रक्तदान करणाऱ्यांची कमतरता याकारणास्तव मुंबई शहरात मोठ्या प्रमाणावर रक्ताचा तुटवडा निर्माण झाला असल्याने नियमितपणे रक्ताची गरज भासणाऱ्या थॅलेसेमियाग्रस्त रुग्णांना लोकमान्य टिळक रुग्णालयाच्या (शीव, मुंबई) थॅलेसेमिया केंद्रातील कक्ष परिचर रक्ताची विक्री करीत असल्याचा धक्कादायक प्रकार दिनांक १४ ऑक्टोबर, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मुंबईतील रुग्णालयात रक्ताचा गैरव्यवहार करणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे

(३) तसेच मुंबईसह राज्यातील रक्त तुटवड्याची समस्या दूर करण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.एकनाथ शिंदे (०७-१२-२०२०) : (१) अशा आशयाची बातमी दिनांक १४ ऑक्टोबर, २०२० रोजीच्या स्थानिक वृत्तपत्रात प्रसिध्द झाली होती ही वस्तुस्थिती आहे.

(२) सदर प्रकरणी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत चौकशी करण्यात आली असता, एका रुग्णाच्या वडिलांनी थॅलेसिमिया सेंटरमधील कक्ष परिचरास रुपये २००/- इतक्या रकमेची टिप दिल्याचे सदर रुग्णाच्या वडिलांनी सांगितल्याचे निदर्शनास आले.

सदर कक्ष परिचराची बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत त्या ठिकाणाहून बदली करण्यात आली आहे.

(३) रक्तपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात आल्या/येत आहेत :-

- विविध हाऊसिंग सोसायटी, सार्वजनिक युवा मंडळे तसेच स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्या सहकार्याने तसेच लॉकडाऊन नंतर रेल्वे स्थानकाजवळ सुध्दा रक्तदान शिबिरे आयोजित केली गेली आहेत.
- वेगवेगळ्या कॉलेजचे एन.एस.एस. युनिट, रोटरी क्लब यांच्या सहकार्याने रक्तदान शिबिरांचे आयोजन करण्यात येते.
- मुंबई जिल्ह्याबाहेर सुध्दा विविध सामाजिक संस्थांच्या मदतीने रक्तदान शिबिरे घेण्यात येत आहेत.
- दिनांक ०१/०३/२०२० ते दिनांक ३०/१०/२०२० या कालावधीत ९२ रक्तदान शिबिरे आयोजित करण्यात आली असून, त्याव्दारे ८५९७ रक्ताच्या पिशव्या जमा करण्यात आल्या आहेत.

राज्यातील रक्त तुटवड्याची समस्या दूर करण्यासाठी खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात आल्या/येत आहेत :-

- विविध राजकीय, सामाजिक, धार्मिक संघटना, गृहनिर्माण सोसायटी व स्वैच्छिक रक्तदाते यांनी पुढाकार घेऊन रक्तदान शिबिरे आयोजित करण्यासाठी आवाहन करण्यात आले होते.
- सदर आवाहनास प्रतिसाद देऊन विविध संस्थांनी रक्तदानाच्या मोहिमेत योगदान दिले असून, त्यामुळे रक्त तुटवड्यावर मात करण्यास मदत झाली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

कर्नाळा (ता.पनवेल, जि.रायगड) येथील खाजगी वन जमिनीवरील सागांसह अन्य वृक्षांची तोड केल्याबाबत

(११) ४९८१ (२३-११-२०२०). श्री.प्रसाद लाड : सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कर्नाळा ग्रुपपंचायत हद्दीतील तारागावा शेजारी (ता.पनवेल, जि.रायगड) खाजगी वने असलेल्या जमिनीवरील स्थानिक वन विभाग कर्मचाऱ्यांच्या व जमीन मालकांच्या संगनमताने सुमारे ३० वर्षे जुन्या सागवान, करंज, गुलमोहर, जांभूळ व आंबा यासारख्या झाडांची कागदोपत्री कोणतीही परवानगी घेतलेली नसताना प्रचंड प्रमाणावर वृक्षतोड केल्याप्रकरणी पनवेल वनपरिक्षेत्र अधिकारी यांच्याकडे दिनांक २२ सप्टेंबर, २०२० रोजी लेखी तक्रार केली असूनही वन विभागाचे संबंधित अधिकारी जमीन मालकांवर व वृक्षतोड करणाऱ्या कंत्राटदारांवर गुन्हा दाखल करण्यास विलंब करीत असून स्थानिक वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी याठिकाणी कामावर असलेल्या खैराटवाडी आदिवासी समाजाच्या बांधवावर गुन्हा दाखल करून मूळ मालकाला संरक्षण दिल्याप्रकरणी तक्रारदार सामाजिक कार्यकर्ते श्री.संतोष ठाकूर यांनी मा.वन राज्यमंत्री यांच्याकडे तक्रार दाखल केली असून याप्रकरणी लक्ष घालून गुन्हेगारांवर कारवाई करण्याची मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केंद्र शासनाच्या पूर्व परवानगीशिवाय वनेतर कामास बंदी असताना तसेच महाराष्ट्र खाजगी वने अधिनियम अंतर्गत कलम २३अ अंतर्गत खाजगी वने हा कायदा लागू असताना, स्थानिक वन विभाग कर्मचाऱ्यांच्या व जमीन मालकांच्या संगनमताने सुमारे ३० वर्षे जुन्या सागवान, करंज, गुलमोहर, जांभूळ, आंबा व फणस यासारख्या झाडांची वृक्षतोडीची वन विभागाकडे कागदोपत्री कोणतीही परवानगी घेतलेली नसताना सर्रासपणे खुलेआम कत्तल केलेली असताना संबंधित जमीन मालक व वृक्षतोड करणाऱ्या कंत्राटदारावर आजपर्यंत गुन्हा दाखल करण्यात आला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने जमीन मालक व वृक्षतोड करणाऱ्या कंत्राटदार तसेच संबंधित वन विभागाचे कर्मचाऱ्यांविरोधात कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.संजय राठोड (०९-१२-२०२०) : (१) होय.
(२) सदर तक्रारीतील नमूद वृक्षतोड रायगड जिल्ह्यातील पनवेल तालुका अंतर्गत मौजा कर्नाळा तारा, सर्वे क्र.१२७/१, ३ व ९ (जुना सर्वे क्र.१६५/१, ३ व ९) मध्ये झाल्याचे निदर्शनास आले आहे. सदर जमिनी संदर्भात भारतीय वन अधिनियम, १९२७ चे कलम ३५(३) अन्वये दिनांक ४/१२/१९६१ रोजी नोटीस जारी झालेली असून महाराष्ट्र खाजगी वने (संपादन) अधिनियम, १९७५ मधील तरतुदीनुसार सदरच्या जमिनीचा वैधानिक दर्जा "राखीव वने" म्हणून आहे. सदर राखीव वनात २९ वृक्षांची तोड झाली असून त्यापासून १०.४६३ घ.मी. लाकूड माल जप्त करण्यात आला आहे. सदर प्रकरणी दिनांक १७/०९/२०२० रोजी वनगुन्हा नोंदविण्यात आला आहे.
(३) या प्रकरणी जप्त केलेले शासकीय लाकूड माल वन विभागाचे ताब्यात आहे. तसेच १) श्रीमती रितु एम.के. अजातशत्रुसिह, २) श्री.बाळाराम हिराजी पवार, ३) श्री.मोतीलाल रुपकिसन खन्ना (तिन्ही राहणारे तालुका पनवेल) यांचेविरुध्द न्याय दंडाधिकारी प्रथम वर्ग, पनवेल न्यायालयात दिनांक २६/११/२०२० रोजी फिर्याद दाखल करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

वैभववाडी-उंबर्डे (ता.वैभववाडी, जि.सिंधुदुर्ग) मार्गावरील जुन्या व कालबाहय पुलाची उंची वाढवून नवीन पूल बांधण्याबाबत

(१२) ४९८९ (२०-११-२०२०). श्री.प्रसाद लाड : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वैभववाडी-उंबर्डे (ता.वैभववाडी, जि.सिंधुदुर्ग) मार्गावरील जुन्या व कालबाहय झालेल्या कमी उंचीच्या पुलावरुन दरवर्षी पावसाळयात मोठ्या प्रमाणावर पाणी वाहून एडगाव, फौजदारवाडी, ईनामदारवाडी इत्यादी २० गावांचा पावसाळ्यात संपर्क तुटत असल्यामुळे सदर पुलाची उंची वाढवून नवीन पूल बांधण्याबाबतची मागणी परिसरातील ग्रामस्थ गत २ वर्षापासून मा.पालकमंत्री, सिंधुदुर्ग, मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, कणकवली, प्रधान सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग (रस्ते) आदीकडे लेखी निवेदनाव्दारे करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने नागरिकांना वैभववाडी-उंबर्डे ह्या जुन्या पुलावरून प्रवास करताना सोसाव्या लागणाऱ्या समस्या विनाविलंब दूर करण्याच्या दृष्टीने तसेच पावसाळयातही रहदारी सुरू राहण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.अशोकराव चव्हाण (१०-१२-२०२०) : (१) हे खरे आहे.

(२) व (३) सदर पुलाची प्रत्यक्ष पहाणी करण्यात आली असून, या पुलाचे निकष, मंजूरी व निधी उपलब्धतेच्या अधीन राहून हाती घेण्याचे नियोजन राहील.

जुई-बापुजी (ता.अलिबाग, जि.रायगड) येथील कांदळवनाची कत्तल केल्याबाबत

(१३) ५०१२ (२३-११-२०२०). डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे : सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जुई-बापुजी (ता.अलिबाग, जि.रायगड) येथील १.८४ हेक्टरवरील कांदळवनाची बेकायदा भरमसाट कत्तल करुन जमीन बळकावल्या प्रकरणी जे.एस.डब्ल्यू. या कंपनीवर कारवाई करण्याचे आदेश कोकण विभागीय

आयुक्त यांनी रायगड जिल्हाधिकाऱ्यांना देऊनही कोणतीच कारवाई झाली नसल्याचे माहे सप्टेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोकण विभागीय आयुक्त यांनी उक्त दोषी कंपनीवर कारवाई करण्याचे आदेश देऊनही जिल्हाधिकारी, रायगड यांच्याकडून कंपनीवर कारवाई करण्यास विलंब होण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने दोषी कंपनीविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.संजय राठोड (११-१२-२०२०) : (१) मौजे जुई बापुजी, ता.अलिबाग, जि.रायगड येथील स.नं. ५० ड चे एकूण क्षेत्र १.८४ पैकी अधिसुचित झालेले कांदळवन क्षेत्र ०.५० हेक्टरचा ताबा महसूल विभागाकडून वन विभागाकडे दिनांक १२/०२/२०१८ रोजी जागेवर सिमांकन न करता देण्यात आलेला आहे. त्यामुळे कांदळवनातील विकासात्मक कामे कोठे केली याबाबत खात्री होत नव्हती. प्रकरणी विभागीय आयुक्त यांच्याकडून संयुक्त मोजणी करण्याबाबत सूचना प्राप्त झाल्या होत्या.

(२) व (३) विभागीय आयुक्त यांच्याकडून प्राप्त सूचना व स्थानिक पातळीवर झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने निवासी उपजिल्हाधिकारी यांच्या सूचनेनुसार दिनांक १०/०१/२०२० ते १३/०१/२०२० रोजी भूमि अभिलेख विभागासोबत संयुक्त पहाणी केली. सदर पहाणी दरम्यान वन विभागाने ताब्यात घेतलेल्या ०.५० हेक्टर कांदळवन क्षेत्रात वन्नेत्तर कामे केल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यानुसार दिनांक ३/०२/२०२० रोजी वस्तुस्थितीनिहाय पंचनामा करुन जे.एस. डब्ल्यू. कंपनीविरुध्द दिनांक ३/०२/२०२० रोजी वनगुन्हा नोंदविण्यात आलेला आहे.

तथापि, भुमि अभिलेख विभागाकडून केलेल्या क्षेत्राचे हद्द निश्चितीबाबत जे.एस.डब्ल्यू. कंपनीने महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ चे कलम २४७ अन्वये जिल्हा अधीक्षक भुमि अभिलेख, रायगड अलिबाग

यांच्याकडे अपील दाखल केले आहे. सदर अपिलाची सुनावणी दिनांक ०९/०७/२०२० रोजी झाली आहे. परंतु सदर अपिलाचा निर्णय प्रलंबित आहे. त्यामुळे पुढील कार्यवाही करणे शक्य झालेले नाही.

उक्त प्रकरणी पर्यावरण (संरक्षण) अधिनियम, १९८६ अंतर्गत उपविभागीय अधिकारी, अलिबाग यांनी मा.मुख्य न्यायदंडाधिकारी, अलिबाग यांच्या न्यायालयात R.C.C No. ८५/२०२० नुसार दावा दाखल केला. असून सदरचा दावा न्यायप्रविष्ट आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील साखर कारखान्यांकडे एफआरपीची रक्कम थकीत असल्याबाबत

(१४) ५०४६ (२३-११-२०२०). श्री.सदाशिव खोत, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.प्रविण दरेकर : दिनांक १० डिसेंबर, २०२० रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ४ मधील प्रश्न क्रमांक ३८८४ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २०२०-२०२१ चा गळीत हंगाम सुरू होत असताना दुसरीकडे राज्यातील ३८ साखर कारखान्यांनी ऊस उत्पादक शेतकऱ्यांची ८१ कोटी ८९ लाख रुपयांची एफआरपीची रक्कम थकविली असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२० च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतकऱ्यांची एफआरपीची रक्कम न देणाऱ्या कारखान्यांच्या विरोधात शासनाने कोणती कारवाई केली आहे,

(३) तसेच शेतकऱ्यांना एफआरपीची उर्वरित रक्कम तात्काळ मिळवून देण्यासंदर्भात शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन यंदा ऊसाचे क्षेत्र वाढल्यामुळे राज्यात उत्पादन झालेल्या जादा साखरेबाबत कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (११-१२-२०२०) : (१) अंशत: खरे आहे.

हंगाम २०१९-२०२० मध्ये राज्यातील साखर कारखान्यांनी ५५०.२९ लाख मे.टन ऊसाचे गाळप केलेले आहे. ऊस पुरवठादारांनी पुरविलेल्या ऊसाचे नियमानुसार देय FRP रुपये १४१५४.५३ कोटी ऊस किंमत होती. त्यापैकी कारखान्यांनी ऊस पुरवठादारांना ऑक्टोबर, २०२० च्या पहिल्या आठवड्यापर्यंत रुपये १४०९६.८१ कोटी म्हणजेच ९९.५९ % रक्कम अदा केली असून दिनांक १५/१०/२०२० अखेर १० कारखान्यांकडे नियमानुसार रुपये ५७.७२ कोटी रक्कम थकित होती. त्यानंतर दिनांक ३१/१०/२०२० अखेर रुपये ३३.९६ कोटी रक्कम थकीत आहे.

(२) ऊस (नियंत्रण) आदेश १९६६ चे कलम ३(३) नुसार कारवाई करण्यासाठी एफआरपी थकीत असलेल्या कारखान्यांवर साखर आयुक्त कार्यालयामार्फत दिनांक १३/०८/२०२०, २४/०९/२०२० व २५/०९/२०२० रोजी सुनावण्या घेण्यात आलेल्या आहेत.

(३) साखर आयुक्त कार्यालयाने हंगाम २०१९-२०२० मधील थकीत एफआरपीबाबत दिनांक ३१/१०/२०२० पर्यंत युटेक शुगर, अहमदनगर, श्री तात्यासाहेब कोरे वारणा सहकारी साखर कारखाना, कोल्हापूर व किसनवीर सहकारी साखर कारखाना, भुईंज, जि.सातारा या ३ कारखान्यांकडील थकीत एफआरपीच्या वसुलीबाबत आरआरसीचे आदेश निर्गमित केले आहेत.

(४) याबाबत केंद्र शासनाच्या खाद्यान्न व सार्वजनिक वितरण विभाग, नवी दिल्ली यांनी व्हिडीयो कॉन्फरसिंगव्दारे ऊस उत्पादक राज्यांचा साखर व इथेनॉल उत्पादनाचा आढावा घेण्यात आला. त्यानुसार महाराष्ट्र राज्यामध्ये २०२०-२०२१ च्या गाळप हंगामात अंदाजित ९९ लाख मेट्रीक टन साखरेचे उत्पादन होवू शकते, याचा विचार करता जास्तीचे साखर उत्पादन कमी करुन साखरेऐवजी बी हेवी, शुगरकेन ज्यूस, शुगर सिरप या उपपदार्थाव्दारे इथेनॉल उत्पादन केल्यामुळे १० लाख मेट्रीक टन साखरेची घट करता येईल.

त्यानुषंगाने केंद्र शासनाने साखर हंगाम २०२०-२०२१ साठी महाराष्ट्र राज्याला १०८ कोटी लिटर्स इथेनॉल निर्मितीचा लक्षांक दिलेला असून, साखर आयुक्तालयाने इथेनॉल निर्मिती करणाऱ्या साखर कारखान्यांना लक्षांक दिलेला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

सामाजिक वनीकरण अकोला परिक्षेत्रातील आखतवाडा येथील अधिकाऱ्यांनी गैरव्यवहार केल्याबाबत

(१५) ५०४७ (२३-११-२०२०). श्री.सदाशिव खोत, श्री.गोपिचंद पडळकर : सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सामाजिक वनीकरण विभागाच्या नाविन्यपूर्ण शासकीय योजनेंतर्गत आखतवाडा ते वाकी लोणार नदीच्या दोन्ही काठावर जेसीबीने खड्डे करून ३३ कोटी वृक्ष लागवडी अंतर्गत ८००० वृक्षारोपण करण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान तसेच दिनांक ६ ऑगस्ट, २०२० रोजी प्रत्यक्षात जीपीएसव्दारे घेण्यात आलेल्या छाया व चल चित्रात कोणत्याही वृक्षरोपणाचे अस्तित्व दिसत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मरगळ लागवडीच्या नावाखाली नाविन्यपूर्ण योजनेत फस्त केलेले काळ्याकुट्ट धरणाचे डॅमेज कंट्रोल केले जात असून मनरेगाचे VSL भाग १ व २ मधील १३ मजुर या कामासाठी वापरून केंद्र शासनाच्या निधीचा वापर करुन सदरहू काम केले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सामाजिक वनीकरण विभाग, अकोला यांचे विरोधात गैरव्यवहाराच्या अनेक तक्रारी वेगवेगळ्या प्रकरणात शासनास प्राप्त झाल्या असून प्रसार माध्यमामध्ये देखील सामाजिक वनीकरण विभागातील अधिकाऱ्यांच्या गैरव्यवहाराची मोठी चर्चा झालेली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त विभागाची व संबंधित अधिकाऱ्यांची चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.संजय राठोड (१०-१२-२०२०) : (१) ३३ कोटी वृक्ष लागवडी अंतर्गत सन २०१९ च्या पावसाळयात राज्य योजनांतर्गत आखातवाडा ते वाकी लोणार नदीकाठच्या रोपवनासाठी जेसीबीने खड्डे खोदले नाहीत, मजुरांकडूनच खड्डे खोदून ६००० रोपांची लागवड केलेली आहे.

(२) सदर रोपवनाची माहे ऑक्टोबर, २०२० ची जिवंत रोपांची टक्केवारी ७५.८३ % इतकी आहे.

(३) सदर रोपलागवडीची कामे राज्य योजनेत केलेली असून, मनरेगा योजनेचा या कामाशी संबंध नाही व मनरेगा वरील मजुरांचा वापर या कामावर केलेला नाही.

(४) व (५) सदर प्रकरणी एक तक्रार जिल्हाधिकारी, अकोला यांचेकडून विभागीय वन अधिकारी, सामाजिक वनीकरण विभाग, अकोला यांना प्राप्त झालेली आहे. तसेच स्थानिक वृत्त पत्रामध्ये दिनांक २०/११/२०२० रोजी पैलपाडा रोपवाटिकेबाबत बातमी छापून आलेली आहे. सदर तक्रारीची चौकशी सुरु आहे, चौकशी अहवाल प्राप्त झाल्यावर त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(६) सदर प्रकरणी कोणताही विलंब झालेला नाही.

पूर्णा नदी परिसरातील (जि.बुलढाणा) कोळसा माफियांकडून बेकायदेशीर वृक्षतोड होत असल्याबाबत

(१६) ५०९९ (२३-११-२०२०). श्री.सदाशिव खोत, श्री.गोपिचंद पडळकर : सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पातोंडा, कांदरखेड, बेलाड व अन्य ठिकाणी (ता.नांदुरा, जि.बुलढाणा) व निंभोरा, भेंडवळ (ता.जळगाव जामोद) आणि इटखेड, पेसोडा, भोनगाव, खिरोडा (ता.संग्रामपूर) व परिसरामध्ये काही कोळसा माफियांनी बेकायदेशीररित्या बेसुमार वृक्षतोड करून कोळसा बनविण्याचा अवैध धंदा अनेक महिन्यांपासून सुरू केला असून सदर अवैध धंदा तात्काळ बंद करून संबंधितांविरुध्द कारवाई करण्यात यावी अशा मागणीचे निवेदन श्री.भूषण हिम्मतराव कोकाटे, भाजप तालुका अध्यक्ष, मुर्तिजापुर, श्री.श्रीकृष्ण सपकाळे, नांदुरा तालुका अध्यक्ष मनसे तसेच अन्य ग्रामस्थांनी दिनांक ५ फेब्रुवारी, २०२० व ३० एप्रिल, २०२० रोजी वा त्यासुमारास जिल्हाधिकारी बुलढाणा, मा.वने मंत्री, प्रधान सचिव, महसूल व वन विभाग (वने), सचिव, पर्यटन

विभाग, प्रधान मुख्य वन संरक्षक नागपूर, मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) अमरावती, उपवनसंरक्षक बुलढाणा आदींकडे सादर केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व सदरहू मागणीच्या अनुषंगाने संबंधित दोषींविरोधात कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.संजय राठोड (०९-१२-२०२०) : (१) व (२) संबंधितांचे निवेदन प्राप्त झाले. तक्रार अर्जात नमूद केलेल्या मुद्यांची चौकशी करण्यात आली. चौकशी अहवालामध्ये पूर्णा नदीच्या काठावर मौजे पातोंडा, कोंदरखेड, बेलाड या परिसरात अवैध विनापरवानगी वृक्ष/झुडुप यांची तोड करुन कोळसा भट्टी लावल्याचे दिसून आले नाही.

मौजे निंभोरा येथील खाजगी गट क्रमांक १४४ मध्ये प्रोसोपिस प्रजातिचे अवैध वृक्षतोड करुन कोळसा भट्टी लावण्यात आल्याचे निदर्शनास आल्याने वनगुन्हा क्र.६८०/२४, दिनांक ६/०३/२०२० जारी करण्यात आला आहे. आरोपीस नुकसान भरपाई म्हणून रुपये ५०००/- वसूल करण्यात आले आहे. वरवंट बकाल वर्तुळ अंतर्गत भेंडवळ बिटामधील मौजे इटखेड येथील वनक्षेत्रामध्ये आरोपी श्री.अयुब पठाण, रा.पाथर्डी जिल्हा अहमदनगर यांनी अवैधरित्या प्रोसोपिस झाडे तोडून कोळसा तयार करीत असताना कारवाई करुन कोळसा पोती ७२ नग किंमत रुपये १९४४०/- जप्त केला आहे. त्यांचेवर वन गुन्हा जारी करुन चौकशी पूर्ण झालेली आहे. याप्रकरणात मा.प्रथम श्रेणी न्यायालय, जळगांव जामोद येथे न्यायप्रविष्ट करण्याची कार्यवाही सुरु आहे. भोनगांव बिटमध्ये अवैध वृक्षतोड करुन भट्टी लावून कोळसा तयार केला जात नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील सहकारी गृहनिर्माण सोसायट्यांमधील सदनिकांच्या थकीत देखभाल शुल्कावर व्याज आकारणी न करण्याबाबत

(१७) ५११७ (२३-११-२०२०). ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.नागोराव गाणार, डॉ.परिणय फुके : सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहरी व निमशहरी भागात सहकारी गृहनिर्माण सोसायट्यांची संख्या लक्षणीय असून सहकारी सोसायट्यांकडून मासिक देखभाल शुल्क (मेंटनन्स चार्ज) आकारले जाते व सदरहू शुल्क मुदतीत न भरल्यास प्रत्येक सोसायटीने केलेल्या नियमानुसार प्रलंबित शुल्कावर ११ ते १२ टक्क्यांपर्यंत व्याज आकारणी केली जाते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोविड-१९ मुळे निर्माण झालेल्या आर्थिक संकटाच्या पार्श्वभूमीवर राज्यातील सहकारी गृहनिर्माण सोसायट्यांमधील रहिवाशांच्या सदनिकांच्या थकीत देखभाल शुल्कावर व्याज आकारणी न करण्याबाबत निर्देश देण्याची विनंती स्थानिक लोकप्रतिनिधींनी (कोकण पदवीधर मतदार संघ) मा.सहकार मंत्री यांना दिनांक २० जून, २०२० रोजी वा त्यासुमारास निवेदन देऊन केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन उक्त निवेदनावर कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (१०-१२-२०२०) : (१) होय,

सहकारी गृहनिर्माण संस्थेचे आदर्श उपविधी क्र.७१ नुसार थकीत मासिक देखभाल शुल्कावर २१ टक्के किंवा निम्नदराने व्याज आकारणी करण्याचा निर्णय संस्थेच्या सर्व सदस्य मंडळास घेता येतो.

(२) होय.

(३) व (४) सहकारी गृहनिर्माण संस्थेचे आदर्श उपविधी क्र.६५ ते ६७ मधील तरतुदीनुसार संस्थेच्या सभासदाकडून शुल्क आकारणी करण्यात येते. थकविलेल्या शुल्क आकारणीवर उपविधी क्र.७१ नुसार संस्थेच्या सर्व सदस्य मंडळाने निश्चित केलेल्या व्याजदराप्रमाणे आकारणी केली जाते. सर्व सदस्य

मंडळाच्या बैठकीमध्ये थकीत शुल्क आकारणीवर २१ टक्के किंवा निम्नदराने व्याज आकारणी करण्याचा निर्णय घेता येतो. म्हणजेच, थकीत रकमेवर व्याज न लावण्याचा पर्याय उपविधी अंतर्गत सहकारी गृहनिर्माण संस्थेस बहाल करण्यात आलेला आहे. याबाबत निर्णय घेण्यास संस्था सक्षम आहेत.
सहकारी गृहनिर्माण संस्थेचे आदर्श उपविधी क्र.१४ नुसार संस्थेस राखीव निधी व सिंकींग फंडाचा विनियोग करता येतो. त्यांच्या वापरासाठी आवश्कतेप्रमाणे संस्थेला संबंधित निबंधकाकडे प्रस्ताव दाखल करता येईल. तसेच, उपविधीतील तरतूदीनुसार थकीत शुल्कावरील व्याज आकारणी, राखीव निधी व सिंकींग फंड याचा विनियोग करण्याची संस्थांना मूभा आहे. त्यानुसार निर्णय घेण्यास सहकारी गृहनिर्माण संस्था सक्षम आहेत.

मुंबई महानगरपालिकेने उभारलेल्या ब्रिमस्टोवॅड प्रकल्पाच्या कार्यक्षमतेबाबत

(१८) ५१७४ (१३-११-२०२०). श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.रामनिवास सिंह, श्री.रमेशदादा पाटील, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रशांत परिचारक, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अमोल मिटकरी, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाने मुंबईत दिनांक २६ जुलै, २००५ रोजी झालेल्या जलप्रलयानंतर जलतज्ञ डॉ.माधवराव चितळे यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीने ब्रिमस्टोवॅड प्रकल्पाची शिफारस आपल्या अहवालाव्दारे सन २००६ मध्ये केल्यानुसार महानगरपालिकेने ब्रीमस्ट्रोवॅड प्रकल्पांतर्गत मुंबईतील सहा महत्वाच्या ठिकाणी प्रचंड क्षमतेचे पंप उभारल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबईत दिनांक २३ सप्टेंबर, २०२० रोजी झालेल्या मुसळधार पावसाचे पाणी ओसरायला आठ ते दहा तास लागले असल्याचे आढळून आले असून सदर प्रकल्पाकरीता केंद्र शासनामार्फत प्रथम १८०० कोटी व तद्नंतर

१००० कोटी रुपये अनुदान देण्यात आले आहे तसेच महानगरपालिकेमार्फत देखील २००० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असूनही उक्त प्रकल्प पूर्ण झाला नसल्याचे दिनांक २४ जुलै, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कोट्यवधी रुपये खर्च करून उभारण्यात आलेल्या उदंचन केंद्रांची कार्यक्षमता तपासण्यात आली आहे काय, या प्रकल्पावर आतापर्यंत किती खर्च करण्यात आला असून प्रकल्पाधीन किती कामे पूर्ण झाली आहेत व किती कामे अपूर्णावस्थेत आहेत, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार मुंबईत पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात पाणी तुंबण्याचे प्रमाण रोखण्याकरीता कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.एकनाथ शिंदे (०७-१२-२०२०) : (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेने ब्रिमस्टोवॅड प्रकल्पांतर्गत लव्ह ग्रोव्ह (वरळी) येथे १० पंप, क्लिवलँड (वरळी गांव) येथे ७ पंप, हाजी अली येथे ६ पंप, ब्रिटानिया (रे रोड) येथे ६ पंप, ईर्ला जुहू येथे ८ पंप व गजधरबंध (सांताक्रुझ) येथे ६ पंप या सहा महत्वाच्या ठिकाणी उदंचन केंद्र (पंपिंग स्टेशन) उभारली आहेत.

सदर पंपिंग स्टेशनमधील प्रत्येक पंपाची क्षमता ६००० लिटर/प्रति सेकंद इतकी आहे.

(२) बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रात दिनांक २३ सप्टेंबर, २०२० रोजी काही ठिकाणी झालेल्या मुसळधार पावसाची तिव्रता ताशी ८० मिमी/१०० मिमी. पेक्षा जास्त होती. तसेच, सरासरी पर्जन्यमान ३५० मिमी. होते.

तथापि, ब्रिमस्टोवॅड प्रकल्पांतर्गत मोठ्या नाल्यांकरीता जलवाहिनी प्रणालीची सुधारणा ५५ मिमी. इतक्या तिव्रतेच्या क्षमतेकरीता संकल्पित करण्यात आली आहे. दिनांक २३ सप्टेंबर, २०२० रोजी सर्व पंपिंग स्टेशनव्दारे एकूण १०,९३३.५६ दशलक्ष लिटर पाण्याचा उपसा करण्यात आला असून, पूर परिस्थितीवर नियंत्रण ठेवण्यात आले.

बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रात ब्रिमस्टोवॅड प्रकल्प राबविण्याकरीता महानगरपालिकेस केंद्र शासनामार्फत रुपये १२०० कोटी इतके विशेष अनुदान मंजूर करण्यात आले असून, त्यापैकी आजतागायत एकूण रुपये १००० कोटी इतकी रक्कम टप्प्याटप्प्याने प्राप्त झाली आहे.

नाला रुंदीकरणाच्या दरम्यान प्रकल्पबाधित झोपड्यांचे सर्वेक्षण, पात्रता व पर्यायी जागा उपलब्ध करुन देण्यास होणारा विलंब तसेच पुनर्वसनास होणारा विरोध, उपयोगिता सेवा वळविण्यात येणाऱ्या अडचणी व विलंब, माहुल येथील उदंचन केंद्रासाठी जमीन संपादन करण्यास येणाऱ्या अडचणी तसेच विविध विभागांकडून ना-हरकत प्रमाणपत्र मिळविण्यास होणारा विलंब इत्यादी कारणांमुळे ब्रिमस्टोवॅड प्रकल्पाच्या अंमलबजावणीकरीता विलंब होत आहे, ही वस्तुस्थिती आहे.

(३) व (४) ब्रिमस्टोवॅड प्रकल्पांतर्गत उभारण्यात आलेल्या सहा पंपिंग स्टेशनमधील प्रत्येक पंपाची कार्यक्षमता प्रथमत: पंप उत्पादकाच्या कंपनीमधील सल्लागार व बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या समक्ष तपासण्यात आली होती व त्याबाबतचा अहवाल समाधानकारक होता.

तद्नंतर कंत्राटात नमूद केल्याप्रमाणे प्रत्येक पंपिंग स्टेशनची कार्यक्षमता चाचणी घेण्यात आली होती व ती समाधानकारक होती.

सदर सहा पंपिंग स्टेशनच्या बांधकाम, प्रचालने व परिरक्षणासाठी सन २००७ पासून आतापर्यंत रुपये ५९१ कोटी इतका खर्च करण्यात आला आहे.

ब्रिमस्टोवॅड प्रकल्पांतर्गत बृहन्मुंबई महानगरपालिकेस एकूण आठ पंपिंग स्टेशन्स बांधावयाची असून, त्यापैकी सहा पंपिंग स्टेशन्स व्यवस्थितरित्या कार्यरत आहेत. उर्वरित माहूल (चेंबूर) व मोगरा (वर्सोवा) या दोन ठिकाणी पंपिंग स्टेशन्स बांधण्यासाठी महानगरपालिकेमार्फत सल्लागाराची नेमणूक करण्यात आली असून, निविदा प्रक्रिया प्रगतीपथावर आहे.

मुंबईत पावसाळ्यात पाणी तुंबू नये याकरीता बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात आल्या/येत आहेत :-

- मिठी नदीच्या पात्रामध्ये पातमुखामधून येणाऱ्या पावसाचे पाणी नियंत्रित करण्याकरीता एकूण २६ ठिकाणी गेट पंप बसविण्याचे काम प्रस्ताविण्यात आले आहे.
- तसेच पात मुखांवर मिनी पंपिंग स्टेशन्स प्रस्ताविण्यात येत आहेत.
- काही सखल भागांमध्ये पाणी तुंबू नये याकरीता अभ्यास/उपाययोजना करण्यासाठी सल्लागाराची नियुक्ती करण्यात येत आहे.

मुंबई शहरातील धोकादायक इमारतींचा पुनर्विकास करण्याबाबत

(१९) ५१७६ (१३-११-२०२०). श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.रामनिवास सिंह, श्री.रमेशदादा पाटील, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रशांत परिचारक : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेने पावसाळ्यापूर्वी केलेल्या सर्वेक्षणात महापालिकेच्या अखत्यारीत येणाऱ्या तब्बल ४४३ इमारती धोकादायक म्हणून जाहीर केले असून गत सात वर्षात महापालिकेच्या अखत्यारीतील ३ हजार ९४५ इमारती व इमारतीचे भाग कोसळून ३०० रहिवाशांना प्राण गमवावे लागले आहे तसेच म्हाडा इमारत दुर्घटनेत ५८ जणांना आपला जीव गमवावा लागल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार मुंबईतील धोकादायक इमारतींचा पुनर्विकास करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.एकनाथ शिंदे (०७-१२-२०२०) : (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेने सन २०२० च्या पावसाळ्यापूर्वी केलेल्या सर्वेक्षणात महानगरपालिकेच्या अखत्यारीत येणाऱ्या ४४३ इमारती धोकादायक असल्याचे जाहीर करण्यात आले आहे.

तसेच, सन २०१४ ते सन २०२० या कालावधीत बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रात इमारत/घर/घरांचे भाग पडल्याच्या एकूण ४१०८ घटना घडल्या असून, सदर घटनांमध्ये २२१ नागरिक मृत व १००६ नागरिक जखमी झाले आहेत.

(२) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अखत्यारीतील इमारती व इमारतीचे भाग कोसळून झालेल्या दुर्घटनांप्रकरणी महानगरपालिकेमार्फत खात्यांतर्गत चौकशी करण्यात आली वा येत असून, चौकशीअंती दोषी आढळलेल्या संबंधितांविरुध्द कारवाई करण्यात आली आहे.

मुंबई शहरातील उपकरप्राप्त इमारतींचा पुनर्विकास म्हाडा अधिनियम १९७६ व विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली-२०३४ मधील नियम ३३(७) नुसार करण्यात येतो.

उपकरप्राप्त नसलेल्या मुंबई शहरातील जुन्या इमारतींचा विकास हा विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली-२०३४ मधील नियम ३३(७ए) नुसार करण्यात येतो.

अस्तित्वात असलेल्या सहकारी गृहनिर्माण संस्थांचा विकास व विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली-२०३४ मधील नियम ३३(७) नुसार करण्यात येतो.

आग लागून नष्ट झालेल्या इमारती अथवा कोसळलेल्या इमारतींच्या पुनर्बांधणीचा प्रस्ताव विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली-२०३४ मधील नियम ३३(६) नुसार करण्यात येतो.

मुंबई शहरातील जुन्या इमारतींचा समूह विकास हा विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली-२०३४ मधील नियम ३३(९) नुसार करण्यात येतो.

धोकादायक इमारतींच्या दुरुस्तीचे तथा पुनर्बांधणीचे प्रस्ताव विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली-२०३४ नियम ६० नुसार मंजूर करण्यात येतात.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

मुंबईतील सफाई कर्मचारी व त्यांच्या कुटुंबियांसाठी आश्रय योजनेंतर्गत सेवासदनिका देण्याबाबत

(२०) ५२०२ (१३-११-२०२०). श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.रामनिवास सिंह, श्री.रमेशदादा पाटील, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रशांत परिचारक, श्री.विलास पोतनीस : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील २८ हजार सफाई कर्मचारी व त्यांच्या कुटुंबियांसाठी आश्रय योजनेंतर्गत मालकी हक्काची सुमारे १६ हजार सेवासदनिका महानगरपालिकेमार्फत उपलब्ध करून देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर सदनिकांच्या योजनेंतर्गत किती संक्रमण शिबिरांची उभारणी करण्यात आली असून सदर प्रकल्पासाठी होणाऱ्या खर्चासाठी महापालिकेकडून किती प्रमाणात आर्थिक तरतूद करण्यात आली आहे,

(३) तसेच उक्त प्रस्तावाचे थोडक्यात स्वरुप काय आहे, सदर प्रकल्पामध्ये सदनिका उभारण्याची कामे खूपच धीम्यागतीने होत असल्याने २८ हजार सफाई कामगारांसाठी सदनिका जलदगतीने उभारण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे व त्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.एकनाथ शिंदे (०७-१२-२०२०) : (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सफाई कर्मचाऱ्यांसाठी आश्रय योजनेंतर्गत सेवासदनिका देण्यात येतात, तथापि, त्यांना मालकी हक्काची घरे देण्याचा बृहन्मुंबई महानगरपालिकेचा कोणताही विचार नाही.

(२), (३) व (४) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या घन कचरा व्यवस्थापन विभागातील २९,६१८ सफाई कामगारांपैकी ५१३९ कामगारांना त्यांच्या सेवाज्येष्ठतेनुसार सेवासदनिका देण्यात आल्या आहेत.

तसेच, धोकादायक सेवासदनिकांचा आश्रय योजनेंतर्गत पुनर्विकास करुन सफाई कामगारांसाठी अंदाजे १४ हजार सेवासदनिका बांधण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत निविदा मागविण्यात आल्या असून, पुढील कार्यवाही सुरु आहे.

तथापि, काही तांत्रिक अडचणींमुळे व निविदेच्या अटी व शर्तींमध्ये बदल झाल्यामुळे कंत्राटदाराच्या अल्पप्रतिसादामुळे निविदा प्रक्रियेस उशीर झाला ही वस्तुस्थिती आहे.

सदर कामाचा कंत्राट कालावधी काम सुरु झाल्यापासून २ वर्षे इतका (पावसाळ्यासहित) आहे.

सदर धोकादायक सेवासदनिकांच्या पुनर्विकासासाठी मुंबई शहर व उपनगर येथे बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत एकूण १० संक्रमण शिबिरे बांधण्यात येऊन, सदर ठिकाणी सफाई कामगारांना तात्पुरत्या स्वरुपात स्थलांतरीत करण्यात आले आहे.

सदर संक्रमण शिबिराकरीता अंदाजे रुपये ४० कोटी इतकी रक्कम बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत खर्च करण्यात आली आहे.

चारकोप, कांदिवली (मुंबई) येथील खारफुटीमध्ये महापालिकेच्या कर्मचाऱ्यांनी कचरा टाकल्याबाबत

(२१) ५२१९ (१३-११-२०२०). श्री.महादेव जानकर, श्री.रामनिवास सिंह : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चारकोप, कांदिवली (मुंबई) येथील खारफुटीमध्ये महापालिकेच्या काही कर्मचाऱ्यांनी कचरा टाकल्याचे माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात स्थानिक नागरिकांनी व्हिडीओ शूट करुन स्थानिक पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, व तद्नुसार शासनस्तरावर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.एकनाथ शिंदे (०७-१२-२०२०) : (१) अशा आशयाची बातमी दिनांक ९ ऑक्टोबर, २०२० रोजीच्या स्थानिक वृत्तपत्रात प्रसिध्द झाली होती ही वस्तुस्थिती आहे.

(२) सदर प्रकरणी स्थानिक पोलीस ठाण्यात स्था.गु.र.क्र. ८६/२०२०, कलम १५(१)(२) पर्यावरण संरक्षण अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(३) दिनांक ०८/१०/२०२० रोजी कांदिवली (पश्चिम) परिसरातील पदपथावरील अनधिकृत तात्पुरत्या कच्च्या झोपड्यांवर बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत निष्कासन कारवाई करण्यात आली होती.

सदर कारवाईदरम्यान बांबू, प्लास्टिक इत्यादी झोपडीचे साहित्य जप्त करण्यात आले होते. तथापि, अपुऱ्या वाहन व्यवस्थेमुळे महानगरपालिकेच्या कामगारांनी सदर जप्त सामान चारकोप सेक्टर ८ येथील कांदळवन क्षेत्राच्या संरक्षित भिंतीलगत जमा करुन ठेवले होते.

सदर सामान त्यादिवशी व दुसऱ्या दिवशी उचलून महानगरपालिकेच्या चौकीत ठेवण्यात आले असून, सदर सामानामुळे कांदळवनातील वृक्षांचे कोणत्याही प्रकारे नुकसान झालेले नाही असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

कळंब (जि.यवतमाळ) येथे अवैध धान्य विक्री होत असल्याबाबत

(२२) ५२३९ (१८-११-२०२०). डॉ.वजाहत मिर्झा, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.मोहनराव कदम, श्री.अमरनाथ राजूरकर : सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळंब व यवतमाळ (जि.यवतमाळ) येथे अवैध प्रकारे धान्य साठवलेली गोदामे असून या गोदामातून संपूर्ण यवतमाळमध्ये काळाबाजाराने अवैध धान्य विक्री होत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२० च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू काळाबाजार वर्धा येथील नामचीन तस्कर रहिम काल्या ही व्यक्ती करीत असल्याची माहिती असूनही प्रशासनाकडून त्याच्यावर तसेच सदर गोदामांवर कोणतीही कारवाई करीत नसल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार संबंधित काळाबाजार करणाऱ्यांविरुध्द व त्यांना सहकार्य करणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.छगन भुजबळ (१०-१२-२०२०) : (१), (२) व (३) कळंब व यवतमाळ (जि.यवतमाळ) येथे ऑक्टोबर, २०२० च्या पहिल्या सप्ताहात काळ्या बाजाराने अवैध धान्य विक्री होत असल्याचे निदर्शनास आलेले नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

जायकवाडी धरणाचे रेखांकन करणेबाबत

(२३) ५३०९ (२३-११-२०२०). श्री.अंबादास दानवे : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मराठवाडा जनता विकास परिषदेने दाखल केलेल्या जनहित याचिका क्र. १७३/२०१३ नुसार मा.उच्च न्यायालय, मुंबईच्या विशेष पीठाने दिनांक २३ सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास जायकवाडी धरणाचे रेखांकन करण्याचे निर्देश दिले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मा.उच्च न्यायालयाच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, जायकवाडी धरणाचे रेखांकन करण्यासाठी शासनाने किती निधी मंजूर केला व त्यापैकी किती खर्च करण्यात आला आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.जयंत पाटील (१०-१२-२०२०) : (१) मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी जनहित याचिका क्र.१७३/२०१३ मध्ये दिनांक २३ सप्टेंबर,२०१६ रोजी दिलेल्या आदेशात जायकवाडी व उर्ध्व गोदावरी उप खोऱ्यात महाराष्ट्र सिंचन पध्दतीचे शेतकऱ्यांकडून व्यवस्थापन अधिनियम, २००५ लागू करुन लाभक्षेत्राचे रेखांकन (Delineation) करुन पाणी वापर संस्था स्थापन करणे व त्यांना क्षेत्र हस्तांतरित करण्याबाबत आदेशित केले आहे.

(२) महाराष्ट्र सिंचन पध्दतीचे शेतकऱ्यांकडून व्यवस्थापन अधिनियम, २००५ नुसार कार्यवाही प्रगतीपथावर असून जायकवाडी प्रकल्पाची अधिसूचना १ व २ पूर्ण झाली आहे व अधिसूचना ३ पूर्ण करुन पाणी वापर संस्था स्थापन करण्याची व पाणी हक्क देणेबाबतची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

(३) जनहित याचिका क्र. १७३/२०१३ अंतर्गत कामे करण्यासाठी सन २०१८-२०१९, २०१९-२०२० व २०२०-२०२१ मध्ये अनुक्रमे ५८.०० कोटी, २२.७५ कोटी व २६.१४ कोटी अशी एकूण १०६.१० कोटी तरतुद केलेली आहे. रेखांकन (Delineation) च्या अनुषंगाने प्रशासकीय मान्यतेचे प्रस्ताव तयार करण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

नांदूर मधमेश्वर प्रकल्प बांधण्याबाबत

(२४) ५३१० (२३-११-२०२०). श्री.अंबादास दानवे : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाडा जनता विकास परिषदेने दाखल केलेल्या जनहित याचिका क्रमांक १७३/२०१३ नुसार मा.उच्च न्यायालय, मुंबईच्या विशेष पीठाने दिनांक २३ सप्टेंबर, २०१६ रोजी दिलेल्या आदेशान्वये नांदूर मधमेश्वर प्रकल्प माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान पूर्ण करणे अपेक्षित होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्प पूर्ण झाला आहे काय व प्रकल्पातील अर्धवट धरणासाठी आणि चाऱ्या, पोट चाऱ्या व इतर भाग-१ ची कामे पूर्ण करण्यासाठी शासनाने किती निधी मंजूर केला आहे,

(३) असल्यास, उपलब्ध निधीपैकी किती निधी खर्च करण्यात आला व भाग-१ चे काम पूर्ण होण्यास किती कालावधी अपेक्षित आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.जयंत पाटील (१०-१२-२०२०) : (१) हे खरे नाही.

जनहित याचिका क्रमांक १७३/२०१३ मध्ये दिनांक २३ सप्टेंबर, २०१६ च्या आदेशात नांदूर मधमेश्वर प्रकल्प माहे डिसेंबर, २०१९ मध्ये पूर्ण करणेबाबत उल्लेख दिसून येत नाही. तथापि, आदेशात उल्लेख केल्याप्रमाणे नांदूर मधमेश्वर कालव्याकरीता बांधण्यात आलेली भाम व इतर प्रकल्प पूर्ण झालेली आहे. त्यावर पाणीसाठा निर्मित झालेला आहे.
(२) नांदूर मधमेश्वर कालव्याकरीता बांधण्यात आलेली ४ धरणे पूर्ण झालेली आहे. त्यासाठी पाणीसाठा निर्मित झालेला आहे. परंतु नांदूर मधमेश्वर कालवा प्रकल्पाची काही कामे अद्याप पूर्ण झालेली नाही. त्याकरीता सन २०२०-२०२१ मध्ये नियमित कामांसाठी रुपये ३५.०० कोटी व लाक्षेवि (भाग-१) कामासाठी रुपये ५.५० कोटीची तरतुद करण्यात आली आहे.
(३) मंजूर तरतुदीपैकी यावर्षी नियमित कामासाठी रुपये ६.०५ कोटी खर्च झालेला आहे. लाक्षेवि (भाग-१) ची कामे मार्च, २०२२ मध्ये पूर्ण करण्याचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

गोरेगाव (आरे), मुंबई येथील प्रस्तावित मेट्रो कारशेड कांजुरमार्गला उभारण्याबाबत

(२५) ५३३२ (१३-११-२०२०). श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आरे, मुंबई येथील प्रस्तावित मेट्रो कारशेड कांजुरमार्गला स्थलांतर करण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व व त्यानुषंगाने शासनाच्या उक्त निर्णयाची अंमलबजावणी करुन मेट्रो कारशेड कांजुरमार्गला उभारण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.एकनाथ शिंदे (०९-१२-२०२०) : (१) होय, हे खरे आहे.

(२) मुंबई मेट्रो-३ (कुलाबा-वांद्रे-सिप्झ) व मुंबई मेट्रो-६ (स्वामी समर्थ नगर-जोगेश्वरी-विक्रोळी) या प्रकल्प मार्गिकेंचे एकत्रिकरण करण्याच्या अनुषंगाने त्याबाबतचा सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) तयार करण्याची बाब मुंबई मेट्रो रेल कॉ.लि. व मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांच्यास्तरावर विचाराधीन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईत पर्जन्य जलवाहिन्यांच्या प्रवेशिकांवरच संरक्षक जाळया बसविल्याबाबत

(२६) ५३४७ (१३-११-२०२०). श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.शरद रणपिसे : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत ठिकठिकाणी असंख्य 'मॅनहोल' असताना केवळ पावसाळयात पाणी भरणाऱ्या पर्जन्य जलवाहिन्यांच्या प्रवेशिकांवरच संरक्षक जाळया बसविण्याचा निर्णय मुंबई महानगरपालिकेने घेतला असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निर्णयामुळे मुंबई शहर व उपनगरातील केवळ साडेतीन हजार जलवाहिन्यांच्या प्रवेशिकांवरच जाळया बसविण्यात आल्यामुळे मुंबई मनपा हद्दीतील अनेक संरक्षक जाळया नसलेले मलनि:स्सारण, सांडपाण्याचे

मॅनहोल पादचाऱ्यांकरीता जीवघेणे व त्रासदायक ठरत असल्याने नागरिकांची होणारी गैरसोय दूर करण्याकरीता शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.एकनाथ शिंदे (०७-१२-२०२०) : (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेतील आपात्कालीन कक्ष यांनी दिलेल्या पूरप्रवण क्षेत्रांच्या माहितीप्रमाणे तसेच विविध विभागीय सहाय्यक आयुक्तांकडून प्राप्त झालेल्या मागणीनुसार सदर प्रकारच्या संरक्षक जाळ्या महानगरपालिकेच्या प्रमुख अभियंता (मलनि:स्सारण प्रचालन) व प्रमुख अभियंता (पर्जन्य जलवाहिन्या) या विभागांमार्फत सन २०१८ पासून बसविण्यात येत आहेत.

(२) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या पर्जन्य जलवाहिन्या विभागामार्फत एकूण २७७२ एवढ्या पर्जन्य जलवाहिन्यांच्या मॅनहोलवर संरक्षण जाळया बसविण्यात आल्या आहेत. त्यापैकी सन २०१८-२०१९ मध्ये शहर विभागात पहिल्या टप्प्यात १७४२ संरक्षक जाळया व सन २०१९-२०२० मध्ये दुसऱ्या टप्प्यात शहर व उपनगरात एकूण १०३० संरक्षक जाळया बसविण्यात आल्या आहेत.

तसेच मलनिःस्सारण प्रचालन विभागामार्फत मुंबई शहर व उपनगरात आतापर्यंत एकूण २४३५ एवढ्या मलनिःस्सारण मॅनहोलवर संरक्षक जाळ्या बसविण्यात आलेल्या आहेत.

सदर मॅनहोल ही महानगरपालिकेतील आपत्कालीन कक्ष तसेच विभागीय सहाय्यक आयुक्त यांच्या मागणीनुसार त्याचप्रमाणे पूरप्रवण क्षेत्रांमधील ज्या मॅनहोलवरील झाकणे उघडणे संभावित आहे अशा मोठ्या आकाराच्या मलनिःस्सारण वाहिन्यांवरील मॅनहोलवर संरक्षक जाळ्या बसविण्यात आलेल्या आहेत.

याव्यतिरिक्त विभागीय सहाय्यक आयुक्तांच्या मागणीनुसार मॅनहोलवर संरक्षक जाळ्या बसविण्याचे काम हाती घेण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

पुणे येथे मुंबई उच्च न्यायालयाचे फिरते खंडपीठ स्थापन करण्याबाबत

(२७) ५३८३ (२०-११-२०२०). श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.मोहनराव कदम : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथे मुंबई उच्च न्यायालयाचे फिरते खंडपीठ स्थापन करण्याबाबत मंत्रिमंडळात झालेल्या निर्णयानुसार सकारात्मक विचार करुन सदर शिफारशीला मान्यता देण्याकरीता शासनामार्फत मा.मुख्य न्यायमुर्ती, मुंबई उच्च न्यायालय यांचेकडे दिनांक १७ जुलै, २०१५ रोजी पत्र सादर करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शिफारशीचा विचार करण्याबाबत दिनांक २८ फेब्रुवारी, २०१८ रोजीच्या शासन पत्रान्वये फेरविनंती करण्यात आली असून याबाबत तातडीने निर्णय घेण्याकरीता बैठक आयोजित करण्याची विनंती मा.मुख्य न्यायमुर्ती यांना दिनांक १९ जानेवारी, २०१९ रोजीच्या शासन पत्रान्वये करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त शिफारशींनुसार पुणे येथे मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ स्थापन करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे व त्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.उध्दव ठाकरे (२६-११-२०२०) : (१) मा.मुंबई उच्च न्यायालयाचे फिरते खंडपीठ कोल्हापूर येथे स्थापन करण्यास मान्यता देण्याची तसेच पुणे येथेही फिरते खंडपीठ स्थापन करण्याबाबत सकारात्मक विचार करण्याची विनंती शासन पत्र, दिनांक १७/०७/२०१५ अन्वये मा.मुख्य न्यायमुर्ती, मुंबई उच्च न्यायालय, मुंबई यांना करण्यात आली आहे.

(२) शासन पत्र, दिनांक १७/०७/२०१५ अन्वये करण्यात आलेल्या शिफारशींचा विचार करण्याबाबत दिनांक २८/०२/२०१८ रोजीच्या शासन पत्रान्वये फेरविनंती करण्यात आली असून याबाबत तातडीने निर्णय होण्याकरीता बैठक आयोजित करण्याची विनंती मा.मुख्य न्यायमुर्ती यांना शासन पत्र, दिनांक १९/०१/२०१९ अन्वये करण्यात आली आहे.

(३) शासन पत्र, दिनांक १९/०३/२०२० अन्वये शासन पत्र, दिनांक १९/०१/२०१९ बाबत मा.उच्च न्यायालय प्रशासनास स्मरण देण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

बंजारा समाजातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाकरीता उपाययोजना करण्याबाबत

(२८) ५४०६ (१८-११-२०२०). श्री.निलय नाईक, श्री.प्रविण दरेकर, डॉ.परिणय फुके, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रसाद लाड : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोरोनाच्या पार्श्वभुमीवर सन २०२०-२०२१ मध्ये शैक्षणिक शिक्षण ऑनलाईन देण्याचा निर्णय शासनाने घेतला असून सदरहू ऑनलाईन शिक्षणासाठी स्मार्ट फोनची गरज असताना तांड्यावरील बऱ्याच विद्यार्थ्यांकडे स्मार्टफोन नसल्यामुळे मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यात एकूण पंधरा जिल्ह्यात बंजारा समाजाचे वास्तव्य असून सदरहू समाज आर्थिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासलेला असल्याने जास्त प्रमाणात वस्ती असणाऱ्यांसाठी आश्रमशाळा सुरू करण्यात आल्या मात्र ऑनलाईन शिक्षणामुळे विद्यार्थी शिक्षणापासून वंचित रहात आहेत, तसेच अशा परिस्थितीत दहावीत असणाऱ्या विद्यार्थ्यांचे जास्त नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन बंजारा समाजातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाच्यादृष्टीने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

प्रा. वर्षा गायकवाड (११-१२-२०२०) : (१) हे अंशत: खरे आहे.
(२) हे खरे नाही.

ज्या ठिकाणी स्मार्ट फोन उपलब्ध नाहीत त्या ठिकाणी शिक्षक गृहभेटीच्या माध्यमातून वस्ती शाळा (Community Classes) च्या माध्यमातून, स्वयंसेवकांच्या माध्यमातून, TV, Radio इ. च्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शिक्षण देत आहेत.
(३) चौकशी करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील धरणाची पाणी साठवण क्षमता वाढविण्याबाबत

(२९) ५५८८ (२३-११-२०२०). श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केंद्रीय जल आयोगाच्या पाहणी अहवालानुसार उजनी धरणात २७.९४% गाळ साठला असून धरणाची पाणी साठवण क्षमता ३२.७६ टीएमसीने कमी झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील धरणातील गाळ काढुन पाणी साठवण क्षमता वाढविण्याबाबत शासनाचे धोरण काय आहे,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने धरणातील गाळ काढुन पाणी साठवण क्षमता वाढविण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.जयंत पाटील (११-१२-२०२०) : (१) हे अंशत: खरे आहे.

केंद्रीय जल आयोगातर्फे तोजो विकास इंटरनॅशनल, नवी दिल्ली या संस्थेने सन २०११ मध्ये केलेल्या सर्व्हेक्षणानुसार उजनी जलाशयाच्या एकूण साठ्यामध्ये १४.९७ टीएमसी गाळ असून एकूण साठ्याशी त्याची टक्केवारी १२.७७ टक्के इतकी आहे.

(२) महाराष्ट्र शासन जलसंपदा विभागामार्फत धरणातील गाळ काढून प्रकल्पाची साठवण क्षमता पुनर्स्थापित करण्याबाबत जलसंपदा विभागामार्फत शासन निर्णय क्र.मेरीना-२०१४/प्र.क्र.१८२/१४ लाक्षेवि (आस्था), दिनांक ०४ मे, २०१७ नुसार व सुधारीत शासन निर्णय क्र.मेरीना-२०१८/प्र.क्र.१३७/१८ लाक्षेवि (आस्था), दिनांक ०३ ऑगस्ट, २०१८ अन्वये उजनी धरणासह ५ मोठ्या प्रकल्पामध्ये साठलेला गाळ व गाळमिश्रीत वाळू निष्कासित करण्याचे धोरण निर्गमित केले होते.

(३) उपरोक्त धोरणातील अडीअडचणी दूर करण्यासाठी शासनाने समिती गठीत केली आहे. समितीची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

पालघर जिल्ह्यात कुपोषणाचे प्रमाणात वाढ झाल्याबाबत

(३०) ५६५४ (२३-११-२०२०). श्री.जयंत पाटील, श्री.विलास पोतनीस, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.रामनिवास सिंह, श्री.रमेशदादा पाटील, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रशांत परिचारक, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.सदाशिव खोत : सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यात टाळेबंदी कालावधीत कुपोषणग्रस्त भागात अंगणवाड्या, ग्रामविकास केंद्र व आरोग्य व्यवस्था आदींवर प्रशासनाने भर न दिल्यामुळे कुपोषणाचे प्रमाण वाढले असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गत वर्षी माहे मार्च ते ऑगस्ट या सहा महिन्यात १ हजार ३७६ अतितीव्र तसेच १२ हजार ६८४ तीव्र कुपोषित बालके आढळून आली असून हे प्रमाण वाढून या वर्षी माहे मार्च ते ऑगस्ट या सहा महिन्यात १ हजार ४९३ अतितीव्र तर १४ हजार १३ तीव्र कुपोषित बालकांची नोंद होवून हे प्रमाण शंभरहून अधिक बालके सॅम (अतितीव्र) व एक हजाराहून अधिक बालके मॅम (तीव्र) गटात आढळून आली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गावाबाहेर व रोजगारासाठी स्थलांतरीत झालेल्या कुटुंबातील बालकांची नोंद शासकीय आकडेवारीत समाविष्ट नसल्याने शासकीय यंत्रणा व कुपोषित बालकांची आकडेवारी जुळत नसल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने पालघर जिल्ह्यात कुपोषणग्रस्त बालकांना सकस व पोषक आहार पुरविण्याबाबत व कुपोषित बालकांचे प्रमाण तसेच बालमृत्यू रोखण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) (१०-१२-२०२०) : (१) हे खरे नाही.

पालघर जिल्ह्याच्या मासिक प्रगती अहवालावरुन माहे मार्च, २०२० मध्ये सॅम बालकांची संख्या २७२ होती तर माहे सप्टेंबर, २०२० अखेर २२७ एवढी आहे.

कोविड-१९ च्या प्रादुर्भावामुळे लावण्यात आलेल्या टाळेबंदी दरम्यान जिल्ह्यामधील अंगणवाड्यांमध्ये येणाऱ्या बालकांची पोषणाची समस्या निर्माण होऊ नये म्हणून ३ ते ६ वर्ष वयाच्या बालकांना, अंगणवाडीमध्ये येणाऱ्या बालकांना कच्चे धान्य स्वरुपात घरपोच आहार देण्यात आला आहे. तसेच अतितीव्र कुपोषित बालकांसाठी होम बेस ग्राम बालविकास केंद्र सुरु करण्यात येवून त्यामध्ये सॅम बालकांना वैद्यकीय अधिकारी यांचे सल्ल्यानुसार EDNF देण्यात आले. पालघर जिल्ह्यातील आदिवासी क्षेत्रामध्ये अमृत आहार योजनेंतर्गत गरोदर व स्तनदा माता यांना ग्राम आहार समितीमार्फत कच्चे धान्याच्या स्वरुपात घरपोच आहार देण्यात येत आहे. तसेच ७ महिने ते ६ वर्ष या वयाच्या बालकांना अंगणवाडीमध्ये आठवड्यातून ४ वेळा देण्यात येणारे अंडी/केळी सुध्दा लाभार्थ्यांना घरपोच देण्यात येत आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

गावाबाहेर व रोजगारासाठी स्थलांतरीत झालेल्या कुटुंबातील बालकांची नोंद ही ते ज्या ठिकाणी स्थलांतरीत झालेले आहे अशा अंगणवाडी केंद्राच्या नोंदवहीमध्ये घेण्यात येते. पालघर जिल्ह्यात ग्रामीण भागात ३१८० व महानगरपालिका क्षेत्रात १४७ अंगणवाडी केंद्र आहेत. अंगणवाडी केंद्रांमधील आकडेवारी अद्ययावत करण्यात येते व यामधील पात्र लाभार्थ्यांना अंगणवाडी सेवांचा लाभ देण्यात येतो. लाभार्थी त्यांच्या पालकांसोबत बाहेरगावी स्थलांतरीत होतात व जेव्हा मुळगावी परत येतात तेव्हा ते अशक्त झालेले असतात त्यावेळी त्यांना पुन्हा सर्व सुविधा पुरवून कुपोषणातून बाहेर काढण्याकरीता प्रयत्न करण्यात येतात.

(४) कुपोषणाचे प्रमाण कमी करण्यासाठी एकात्मिक बालविकास सेवा योजनेंतर्गत खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येतात :-

१) ६ महिने ते ३ वर्ष वयोगटातील लाभार्थी बालके, गरोदर स्त्रिया आणि स्तनदा माता यांना घरपोच आहार नियमितपणे देण्यात येत आहे.

२) सद्य:स्थितीत कोविड-१९ च्या प्रादुर्भावामुळे ३ ते ६ वर्ष वयोगटातील लाभार्थ्यांना गरम ताजा आहाराऐवजी घरपोच आहार योजनेंतर्गत कच्चे धान्य व किराणा मालाचा पुरवठा करण्यात येत आहे.

३) आदिवासी भागात अमृत आहार योजनेंतर्गत गरोदर स्तनदा मातांना चौरस आहार तसेच ६ महिने ते ६ वर्ष वयोगटातील बालकांना आठवड्यातून ४ वेळा अंडी, केळी देण्यात येत आहेत.

४) राज्यातील सॅम बालकांसाठी ग्राम बालविकास केंद्र सुरु करण्यात आले आहेत. यामध्ये लाभार्थ्यांना तीन वेळचा अतिरिक्त आहार देण्यात येत आहे.

राज्यातील ग्रामीण व आदिवासी भागातील सॅम बालकांना सर्वसाधारण श्रेणी आणण्यासाठी ग्राम बालविकास केंद्रांची स्थापना करण्यात आली असून या बालकांची अंगणवाडी सेविका, आशा वर्कर यांचेमार्फत स्क्रिनिंग केल्यानंतर वैद्यकीय अधिकारी यांनी प्रमाणित केल्यावर ज्या सॅम बालकांना कोणताही दुर्धर आजार नाही अशा बालकांना ग्राम बालविकास केंद्रात दाखल करण्यात येते. ग्राम बालविकास केंद्रात सॅम बालकांना

औषधोपचार देवून वैद्यकीय अधिकाऱ्यांना ठरवून दिलेल्या मात्रानुसार मायक्रोन्युट्रियन्ट फोर्टीफाईड हा शास्त्रोक्त पध्दतीने तयार केलेला पौष्टीक आहार EDNF देण्यात येतो.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

अकोला जिल्ह्यातील बचत गटाच्या महिलांना शासकीय कर्मचाऱ्यांचा दर्जा मिळण्याबाबत

(३१) ५६९५ (२३-११-२०२०). श्री.अमोल मिटकरी : सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्ह्यातील अंगणवाडी सेविका, मदतनीस, आशावर्कर, गटप्रवर्तक व आहार पुरवठा बचतगटाच्या महिला यांना शासकीय कर्मचाऱ्यांचा दर्जा देणे, कोरोना सर्व्हेक्षण करणाऱ्या आशा वर्कर्सना प्रतिदिन रुपये ३०० प्रमाणे भत्ता व अंगणवाडी सेविकांना सेवानिवृत्तीच्याच दिवशी विम्याच्या रक्कमेचा धनादेश व प्रलंबित विमा प्रकरणे महिनाभरात निकाली काढावी या मागण्यासंदर्भात दिनांक १४ ऑक्टोबर, २०२० रोजी राज्यातील जिल्हाधिकारी कार्यालय व महानगरपालिका येथे निदर्शने करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रलंबित विम्याची प्रकरणे येत्या महिनाभरात निकाली काढून सेवानिवृत्तीच्याच दिवशी विम्याच्या रक्कमेचा धनादेश वितरित करण्याबाबत संबंधित शासकीय व विमा कंपनीच्या अधिकाऱ्यांसमवेत दिनांक २२ जुलै, २०२० रोजी वा त्यासुमारास झालेल्या बैठकीत मा.महिला व बालविकास मंत्री यांनी आदेश दिल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) (१०-१२-२०२०) : (१) हे अंशत: खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) मा.मंत्री, महिला व बालविकास विभाग यांचे अध्यक्षतेखाली दिनांक २२ जुलै, २०२० रोजी बैठकीमध्ये प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्याबाबत सूचना देण्यात आल्या. त्यानुषंगाने ९०० प्रलंबित प्रस्ताव जीवन विमा महामंडळाकडे पाठविण्यात आले त्यापैकी ८३१ प्रस्ताव मंजूर करण्यात आले आहेत. तद्नंतर दिनांक ३/११/२०२० रोजी मा.मंत्री महोदयाकडे झालेल्या आढावा बैठकीमध्ये प्रस्ताव सादर करताना येणाऱ्या अडचणींवर चर्चा करण्यात आली व मा.मंत्री महोदयांनी दिलेल्या सूचनेनुसार एकात्मिक बालविकास सेवा योजना, आयुक्तालयामार्फत विशेष मोहिम राबविण्यात आली. त्यानुसार १९६९ प्रस्ताव जीवन विमा महामंडळाकडे सादर करण्यात आले होते. त्यापैकी १०७१ प्रस्ताव मंजूर झाले असून उर्वरीत प्रस्तावावर कार्यवाही चालू आहे. अंगणवाडी सेविका व मदतनीस यांना एकरकमी योजनेचा लाभ सुलभतेने मिळण्यासाठी ऑनलाईन पोर्टल तयार करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

वरळी, मुंबई येथील एनएसीआय कोविड केंद्रामध्ये गैरव्यवस्थापन वाढल्याबाबत

(३२) ५७३६ (१३-११-२०२०). श्री.सुजितसिंह ठाकूर, श्री.महादेव जानकर, श्री.रामनिवास सिंह : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वरळी, मुंबई येथील कोरोना रुग्णांच्या अलगीकरण आणि वैद्यकिय उपचारांकरीता सुरु करण्यात आलेल्या एनएसीआय कोविड केंद्रामध्ये औषधांचे व्यवस्थापन, वापर आणि साठवणूक यामध्ये गैरव्यवस्थापन वाढल्याच्या अनेक तक्रारी महापालिकेकडे प्राप्त झाल्याचे माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने दोषीविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.एकनाथ शिंदे (०७-१२-२०२०) : (१) व (२) अशा आशयाची माहिती वा तक्रार कोणत्याही वर्तमानपत्रामध्ये अथवा इतर तत्सम स्त्रोतांव्दारे बृहन्मुंबई महानगरपालिकेस प्राप्त झालेली नाही.

तथापि, वरळी येथील एनएससीआय डोम कोविड महासुविधा केंद्रामध्ये औषधांचे व्यवस्थापन, वापर व साठवणूक करण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वरिष्ठ वैद्यकीय अधिकारी यांच्या देखरेखीखाली औषध भांडार स्थापन करण्यात आले असून, महानगरपालिकेच्या प्रचलित विहित कार्यपध्दतीनुसार सदर औषध भांडाराचे कामकाज सुयोग्यरित्या पार पाडले जात आहे.

तसेच सदर औषध भांडारातील औषध वितरण व संग्रह पडताळणी महानगरपालिकेच्या "चाचणी लेखा परीक्षा व दक्षता अधिकारी-संग्रह पडताळणी" या विभागाव्दारे करण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

समाजकल्याण विभागांतर्गत शासकीय निवासी कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोग लागू करण्याबाबत

(३३) ५७९८ (२३-११-२०२०). श्री.किशोर दराडे : सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) समाजकल्याण विभागांतर्गत सुरु असलेल्या शासकीय निवासी शाळेतील सहायक शिक्षक, प्रयोगशाळा सहाय्यक व ग्रंथपाल यांना सातवा वेतन आयोग लागू झालेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, समाजकल्याण विभागांतर्गत सुरु असलेल्या आश्रमशाळांना सातवा वेतन आयोग लागु झालेला आहे, परंतु शासकीय निवासी शाळेतील कर्मचारी यांना सातवा वेतन आयोग लागू झालेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शासकीय निवासी शाळेतील कर्मचारी यांना सातवा वेतन आयोग लागू करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.धनंजय मुंडे (१०-१२-२०२०) : (१) होय.

(२) राज्यातील स्वयंसेवी संस्था संचलित अनुसूचित जातीच्या १९ प्राथमिक/माध्यमिक आश्रमशाळांना सातवा वेतन आयोग लागू करण्यात आलेला आहे.

(३) नियमानुसार योग्य ती कार्यवाही सुरू आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

मौजे पनोरी (ता.अकोट, जि.अकोला) येथील पुलाची दुरवस्था झाल्याबाबत

(३४) ५८०५ (२०-११-२०२०). श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अनिकेत तटकरे : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे पनोरी (ता.अकोट, जि.अकोला) येथील पनोरी-दनोरी मार्गावरील पठार नदीवर बांधण्यात आलेल्या पुलाची अत्यंत दुरवस्था झाली असल्याचे दिनांक १९ ऑक्टोबर, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पठार नदीला आलेल्या पुरामुळे गावंकऱ्यांचा संपर्क तुटुन त्यांना स्थलांतरीत व्हावे लागत असल्यामुळे त्याठिकाणी नवीन पुलाचे बांधकाम करण्यात यावे या मागणीसाठी परिसरातील सर्व गावकऱ्यांनी नदीपात्रात बसून दिनांक २ ऑक्टोबर, २०२० रोजी एका दिवसाचे अन्नत्याग आंदोलन केले असून स्थानिक लोकप्रतिनिधींनी यासंदर्भात मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांना माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने दनोरी-पनोरी रस्त्याचे व पुलाचे बांधकाम त्वरीत सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.अशोकराव चव्हाण (१०-१२-२०२०) : (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) सदरचे काम निकष, मंजूरी व निधी उपलब्धतेच्या अधीन राहून हाती घेण्याचे नियोजन राहील.

राज्यातील मिठाई विक्री संदर्भात नियमावलीची अंमलबजावणी करण्याबाबत

(३५) ५८०९ (१८-११-२०२०). श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अनिकेत तटकरे, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे : सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अन्न व औषध प्रशासन विभागाने मिठाईच्या विक्री संदर्भात नियमावली तयार केली असून दिनांक १ ऑक्टोबर, २०२० पासून मिठाईच्या ट्रेसमोर, कंटेनरवर किंवा काचेच्या काऊंटरवर बेस्ट बिफोर (किती दिवसात खावी) लिहिणे बंधनकारक केले आहे, मात्र अकोला जिल्ह्यातील अनेक मिठाई विक्रेते व ग्राहक या नियमावलीबाबतीत अनभिज्ञ असल्याचे एका दैनिकाने केलेल्या पाहणीतून निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक १ ऑक्टोबर, २०२० पासून केंद्रीय अन्न सुरक्षा व मानके प्राधिकरणाने तसेच अन्न व औषध प्रशासनाने लागू केलेल्या नियमांचे अनेक मिठाईच्या दुकानदारांकडून पालन केले जात नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरहू नियमांची दुकानदारांकडून अंमलबजावणी करणेबाबतची कार्यवाही करुन नियमाची अंमलबजावणी न करणाऱ्या संबंधित दुकानदारांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ.राजेंद्र शिंगणे (११-१२-२०२०) : (१) हे अंशत: खरे आहे.

अन्न सुरक्षा व मानके प्राधिकरण, नवी दिल्ली यांनी दिनांक १ ऑक्टोबर, २०२० पासून खुल्या स्वरुपातील भारतीय मिठाई ज्या ट्रे भांड्यात विक्रीसाठी ठेवली आहे त्यावर ती कधीपर्यंत वापरण्यास योग्य असेल ती तारीख नमूद करणे बंधनकारक असल्याचे तर त्याचा उत्पादन दिनांक नमूद करणे ऐच्छिक असल्याचे निर्देश दिले आहेत. याबाबत स्थानिक वृत्तपत्रातून दिनांक १६/१०/२०२० रोजी प्रसिध्दी देण्यात आली होती.

(२) हे अंशत: खरे आहे.

(३) या प्रकरणी चौकशी करण्यात आली असून अकोला कार्यालयामार्फत सन २०२०-२०२१ मध्ये सदर नियमावलीच्या अनुषंगाने एकूण ३४ मिठाई उत्पादकांची/विक्रेत्यांची तपासणी केली असता ३१ ठिकाणी या नवीन नियमांचे पालन होत असल्याचे आढळले व ३ मिठाई विक्रेत्यांना रुपये ६०००/- दंड ठोठावण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

कुभांरी (ता.जि.बीड) गावाचे पुनर्वसन करण्याबाबत

(३६) ५८१२ (१३-११-२०२०). श्री.विनायकराव मेटे : सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड तालुक्यातील सात्रा-पोत्रा साठवण तलावाचे काम हे गेल्या १० ते १२ वर्षांपासून सुरु असून काम अंतिम टप्प्यात आहे मात्र या तलावाच्या बुडीत क्षेत्रात कुंभारी हे गाव येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या गावाचे पुनर्वसन करणे आवश्यक असताना ग्रामस्थांचे पुनर्वसन केले नसल्यामुळे शासनावर हा प्रकल्प पूर्ण करण्यासाठी उत्तरोत्तर आर्थिक खर्च वाढत आहे, जी थोडेफार पुनर्वसन प्रक्रिया चालू आहे ती चुकीच्या पध्दतीने सुरु असून यामध्ये खरे लाभार्थी लाभ घेऊ शकलेले नाहीत अशी तक्रार संबंधित शासकीय यंत्रणेकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कुंभारी गावाचे पुनर्वसन करण्यासंदर्भात कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.विजय वडेट्टीवार (०९-१२-२०२०) : (१) होय.

(२) सात्रा-पोत्रा साठवण तलावामुळे बाधित झालेल्या कुंभारी गावाच्या पुनर्वसनासाठी भूखंड अभिन्यास व सानुग्रह अनुदान मंजूर असल्याने पुनर्वसन खर्चामध्ये वाढ होणार नाही. तसेच पुनर्वसित गावठाणातील नागरी सुविधांची कामे जवळपास पूर्ण करण्यात आली आहेत.

(३) मौजे कुंभारी या गावाचे पुनर्वसन करण्यासाठी लाभार्थी कुटुंबधारकाच्या यादया सहा वेळेस तयार करण्यात आल्या त्या यादयांवर गावातील लोकांचे आक्षेप प्राप्त झाल्यामुळे अंतिम याद्या तयार होऊ शकल्या नाहीत. महाराष्ट्र प्रकल्पग्रस्त पुनर्वसन कायदा १९९९ नुसार कलम ११(१) ही अधिसूचना दिनांक ०७/०७/२००५ प्रसिध्द करण्यात आली, त्यावेळी ज्या कुटुंबधारकांची नावे मालमत्ता रजिस्टरमध्ये होती अशाच लोकांची नावे यादीमध्ये समाविष्ट करुन १८० कुटुंबांच्या यादीस जिल्हाधिकारी बीड यांनी मान्यता दिली. सदर यादी प्रसिध्द होताच प्रकल्पबाधित कुटुंबातील लोकांनी पुन्हा तक्रारी अर्ज केले असून सदर अर्जावर सुनावण्या घेवून कुटुंब यादी अंतिम करण्यात येत आहे. यादी अंतिम झाल्यावर भूखंड वाटप आणि स्वेच्छा सानुग्रह अनुदान वाटप करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

औरंगाबाद येथील रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे करण्यात आल्याबाबत

(३७) ५८६७ (२०-११-२०२०). श्री.विक्रम काळे : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद येथील चिकलढाणा विमानतळ ते केंब्रिज चौक, महावीर चौक ते नागर चौकापर्यंतचे डांबरीकरण, आकाशवाणी चौकात उड्डाणपूल तसेच अदालत रोड व मुकूंदवाडी येथे पादचारी पूल इ. कामांचे रुपये ७४ कोटीचे कंत्राट राष्ट्रीय महामार्ग विभागामार्फत (न्हाई) हैद्राबाद येथील सृष्टी इंजिनियरिंग या कंपनीला देण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हैद्राबाद येथील सृष्टी इंजिनियरिंग या मूळ कंत्राटदार कंपनीने सदर कामाचे कंत्राट औरंगाबाद येथील चोरडिया या कंत्राटदारांस परस्परित्या दिल्यामुळे डांबरीकरणाचे काम चोरडिया या कंत्राटामार्फत करण्यात येत असल्याचे दिनांक ०३ मे, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर डांबरीकरणाचे काम केल्यावर रस्त्याच्या साईडपट्ट्यांचे काम मुरुम वापरून करणे बंधनकारक असताना, लोखंडी पूल ते नगरनाका रस्त्यावर कंत्राटदार (चोरडिया) यांनी मातीचा वापर केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, त्याबाबत तांत्रिक संचालक, राष्ट्रीय महामार्ग (न्हाई) (NHAI) यांचेकडे नागरिकांनी तक्रारी केल्या असताना, साईडपट्ट्या भरण्याची तरतूद निवेदनात नव्हती, परंतु मातीचा वापर केला जात असल्यास त्याची पाहणी केली जाईल" असे तांत्रिक संचालकांकडून सांगण्यात येवूनही अद्याप कोणतीही कार्यवाही झाली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.अशोकराव चव्हाण (०४-१२-२०२०) : (१) सदर काम केंद्र शासनाच्या भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाच्या अखत्यारीत येते. हे खरे आहे, असे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, औरंगाबाद यांनी कळविले आहे.

(२) या करारनाम्या अंतर्गत कुठलेही काम sublet करण्यात आलेले नाही, असे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, औरंगाबाद यांनी कळविले आहे.

(३) व (४) करारनाम्यामध्ये साईडपट्टया मुरूमाने भरण्याची तरतूद नाही. तथापि, सुरक्षेच्यादृष्टीने कंत्राटदाराकडून विनामूल्य साईडपट्टया भरुन घेण्यात आल्या आहेत, असे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, औरंगाबाद यांनी कळविले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

औरंगाबाद येथील आरोग्य विज्ञान विद्यापीठांतर्गत इमारतीचा प्रस्ताव प्रलंबित असल्याबाबत

(३८) ५८६८ (२३-११-२०२०). श्री.विक्रम काळे : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आरोग्यविषयक अभ्यासक्रम नाशिकच्या आरोग्य विज्ञान विद्यापीठांतर्गत चालविला जात असून राज्यस्तरावर असलेल्या विभागीय ४ आरोग्य केंद्रापैकी औरंगाबाद येथील केंद्रामार्फतही कामकाज चालविले जाते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, औरंगाबाद येथील केंद्र भाड्याच्या जागेत चालविले जात असून या केंद्राच्या इमारतीसाठी विमानतळाच्या मागील बाजूस २ एकर जागा घेण्यात येऊन सार्वजनिक बांधकाम विभागाने सदर इमारतीचे नकाशे मंजूर केल्याचे तसेच शासनाने ५ वर्षापूर्वीच रुपये १२ कोटी निधी मंजूर केला असूनही इमारतीचा प्रस्ताव प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर इमारतीचे नकाशे व आराखडे मंजूर करण्यात येऊन व मंजूर केलेला निधी शासनाने उपलब्ध करुन दिला नसल्याचे दिनांक १० जून, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर इमारतीचा प्रस्ताव प्रलंबित राहण्याची कारणे काय आहेत,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने इमारत बांधकामासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.अमित विलासराव देशमुख (११-१२-२०२०) : (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) हे अंशत: खरे आहे.

औरंगाबाद विभागीय केंद्राच्या बांधकामाकरीता शासनाने ५ वर्षापूर्वीच रुपये १२ कोटी निधी मंजूर केलेला नाही.

सदरचे बांधकाम विद्यापीठ निधीमधून सार्वजनिक बांधकाम विभाग, औरंगाबाद यांच्यामार्फत सुरु करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

सिंधुदुर्ग जिल्ह्यात प्राधान्य कुटुंब योजनेखालील शिधापत्रिकाधारक स्वस्त धान्यापासून वंचित असल्याबाबत

(३९) ५९०९ (०१-१२-२०२०). श्री.प्रसाद लाड, श्री.सदाशिव खोत, श्री.गोपिचंद पडळकर : सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सिंधुदुर्ग जिल्ह्यात सुमारे २ लाख, ३३ हजार, १५ शिधापत्रिकाधारक असून त्यातील अंत्योदय योजनेतून २२ हजार, ९६० शिधापत्रिकाधारक म्हणजेच ८१ हजार, १९५ लोक आहेत, तर प्राधान्य कुटुंब योजनेखाली

१ लाख, ५३ हजार, ५३१ शिधापत्रिकाधारक असून त्याची लोकसंख्या ५ लाख, ८६ हजार, ९०२ इतकी आहे, तसेच शुभ्र (पांढरे) शिधापत्रिकाधारक २१ हजार, २२४ आहेत तर केसरी शिधापत्रिकाधारक ३५ हजार ४७४ असून लोकसंख्या १ लाख, २६ हजार, ८७० इतकी आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्राधान्य कुटुंब योजनेच्या शिधापत्रिकाधारकांना प्रतिमहा प्रति ३ किलो तांदूळ व २ किलो गहू देण्याबाबत शासनाने जाहीर केले असून सदरहू प्राधान्य कुटुंब योजनेच्या शिधापत्रिकाधारकातील सिंधुदुर्ग जिल्ह्यात ५६ हजार शिधापत्रिकाधारक स्वस्त धान्यपासून वंचित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन वंचित शिधापत्रिकाधारकांना स्वस्त धान्य मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

श्री.छगन भुजबळ (१०-१२-२०२०) : (१) अंशत: खरे आहे.

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील शिधापत्रिकांचा माहे ऑक्टोबर, २०२० अखेरचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे :-

प्रकार	शिधापत्रिका	शिधापत्रिकांवरील सदस्य
पिवळी (अंत्योदय)	२२,९६६	८१,१९८
पिवळी (प्राधान्य कुटुंब लाभार्थी)	४६,३२३	१,९१,६९८
केशरी (प्राधान्य कुटुंब लाभार्थी)	१,०७,१९९	३,९५,३१९
केशरी (बिगर प्राधान्य)	३५,६२२	१,२७,१६३
शुभ्र	२१,२३५	६९,०३९
एकूण	२,३३,३४५	८,६४,४१७

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

राज्याच्या समतोल विकासाबाबत डॉ.विजय केळकर समितीने अहवाल सादर केल्याबाबत

(४०) ६०१६ (२०-११-२०२०). श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.राजेश राठोड, श्री.मोहनराव कदम, श्री.अमरनाथ राजूरकर : दिनांक ८ सप्टेंबर, २०२० रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ६ मधील प्रश्न क्रमांक ४५७२ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विभागीय असमतोलाचा अभ्यास करुन राज्याच्या समतोल विकासाबाबत उपाययोजना सुचविण्यासाठी सन २०११ मध्ये जेष्ठ अर्थतज्ञ डॉ.विजय केळकर यांच्या अध्यक्षतेखाली राज्य शासनाने नेमलेल्या चौदा सदस्यांच्या समितीने शासनास सादर केलेल्या अहवालावर निर्णय घेतला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अहवालावर निर्णय न घेण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उक्त अहवालावर निर्णय घेण्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे व किती कालावधी लागणे अपेक्षित आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.अजित पवार (१०-१२-२०२०) : (१), (२), (३) व (४) डॉ.विजय केळकर यांच्या अध्यक्षतेखाली गठित करण्यात आलेल्या समतोल प्रादेशिक विकास उच्चस्तरीय समितीच्या अहवालातील शिफारशी व प्रशासकीय विभागांचे अभिप्राय विचारात घेऊन, शिफारशी स्वीकारण्यासंदर्भात मंत्रिमंडळ उप समिती गठित करण्यात आली आहे. सदर मंत्रिमंडळ उप समितीने आपला अहवाल मंत्रिमंडळास सादर करावयाचा आहे.

महिला व बालविकास विभागांतर्गत शालेय पोषण आहाराचे कंत्राट नियमबाहय पध्दतीने दिल्याबाबत

(४१) ६०१८ (२३-११-२०२०). श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.राजेश राठोड, श्री.अमरनाथ राजूरकर : तारांकित प्रश्न क्रमांक २७३ ला दिनांक ३ मार्च, २०२० रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अंगणवाड्यांमार्फत लाभार्थ्यांना पूरक पोषण आहार पुरविण्यासाठी रुपये ६३०० कोटी खर्चाची कंत्राटे देण्याबाबतचा निर्णय शासनाने दिनांक २३ फेब्रुवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास घेतला असून त्यानुसार दिनांक ८ मार्च, २०१६ रोजी नियमांकडे दुर्लक्ष करीत महिला व बालविकास विभागाने कंत्राटे दिली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त रुपये ६३०० कोटी खर्चाची देण्यात आलेली कंत्राटे/निविदा नियमबाहय व बेकायदेशीर असल्याच्या कारणामुळे ती रद्द करण्याचा आदेश मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक २६ फेब्रुवारी, २०१९ रोजी दिले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) (१०-१२-२०२०) : (१) हे खरे नाही.

एकात्मिक बालविकास सेवा योजनेंतर्गत अंगणवाड्यांमध्ये ६ महिने ते ३ वर्षाची बालके, गरोदर स्त्रिया व स्तनदा माता यांना घरपोच आहार (THR) वितरित करण्याकरीता केंद्र शासनाच्या गाईडलाईन व मा.सर्वोच्च न्यायालयाच्या यापूर्वीच्या आदेशांच्या अधिन राहून वार्षिक रुपये ७०० कोटी किंमतीची निविदा दिनांक ८ मार्च, २०१६ रोजी प्रकाशित करण्यात आली होती.

(२) मा.सर्वोच्च न्यायालयाच्या दिनांक २६/०२/२०१९ च्या आदेशाचे स्वरुप खालीलप्रमाणे आहे :-

१) THR पुरवठ्याची दिनांक ८ मार्च, २०१६ ची निविदा रद्द करण्यात यावी.

२) मा.सर्वोच्च न्यायालयाच्या दिनांक १९/०४/२०१७ च्या अंतरिम आदेशानुसार दिलेले १८ संस्थांचे काम थांबविण्यात यावे.

३) १८ संस्थांचा पुरवठा बंद करुन १० दिवसांच्या आत THR पुरवठ्याची पर्यायी व्यवस्था करण्यात यावी. THR पुरवठ्याकरीता एक महिन्याच्या आत नविन निविदा काढण्यात यावी.

४) नविन निविदा काढताना पंचायत किंवा ग्रुप ऑफ पंचायत हे युनिट धरुन निविदा काढण्यात याव्यात.

मा.सर्वोच्च न्यायालयाच्या वरील आदेशानुसार १८ संस्थांचे काम थांबविण्यात आले आहे. तसेच THR पुरवठ्याकरीता पर्यायी व्यवस्था करण्यात आली आहे. जिल्हास्तरावरुन नविन निविदा प्रकाशित करण्याकरीता ग्रामपंचायत किंवा ग्रुप ऑफ पंचायत हे युनिट धरुन दिनांक ९/०८/२०१९ रोजी सर्व जिल्हाधिकारी यांना कळविण्यात आले आहे. यानुसार प्रकाशित करण्यात आलेल्या प्रथम निविदेला फारच कमी प्रतिसाद मिळाल्यामुळे दिनांक २७/०१/२०२० रोजी दुसऱ्यांदा फेरनिविदा काढण्यात आली. परंतु या दोन्ही निविदांना अगदी अल्प प्रतिसाद मिळाल्याने दिनांक २७/१०/२०२० रोजी तिसऱ्यांदा निविदा काढण्याकरीता सर्व जिल्हाधिकाऱ्यांना कळविण्यात आले आहे. यानुसार सद्य:स्थितीत निविदा प्रक्रिया पूर्ण करण्याचे काम सुरु आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

धारुर (जि.बीड) तालुक्यात सामाजिक वनीकरण वृक्ष लागवडीत आर्थिक गैरव्यवहार झाल्याबाबत

(४२) ६०१९ (२३-११-२०२०). श्री.संजय दौंड : सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धारुर (जि.बीड) तालुक्यात सामाजिक वनीकरण विभागामार्फत गेल्या वर्षी आठ गावांचा समावेश असलेल्या क्षेत्र ४६ किलोमीटर ते ३५ हेक्टरमध्ये वृक्ष लागवड करण्याचा कार्यक्रम राबविण्यात आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रत्यक्षात वा क्षेत्रात वृक्ष लागवड न करताच बोगस मजुर दाखवून धारुर वन विभागाच्या वनपाल यांनी करोडो रुपयांचा आर्थिक गैरव्यवहार केल्याचे दिनांक २४ जून २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित वनपालांविरुध्द कारवाई करावी अशा आशयाचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.वने राज्यमंत्री यांना दिनांक १८ ऑगस्ट, २०२० रोजी वा त्यासुमारास देऊन तशी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित वनपाल व अन्य संबंधितांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.संजय राठोड (१०-१२-२०२०) : (१) व (२) धारुर तालुक्यात सामाजिक वनीकरण विभागामार्फत सन २०१९-२०२० मध्ये गेल्या वर्षी कुठल्याही प्रकारची वृक्ष लागवड करण्यात आलेली नाही. त्यामुळे आर्थिक गैरव्यवहार होण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) मा.लोकप्रतिनिधीनी चौकशीची मागणी केलेली होती.

(४) चौकशी करण्यात आलेली असून, चौकशीमध्ये अनियमितता आढळून आलेली नाही. त्यामुळे कार्यवाही करण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही.

(५) विलंब झालेला नाही.

मुंबई महापालिकेने दिव्यांग कर्मचाऱ्यांचे वेतन अदा करण्याबाबत

(४३) ६०८७ (२०-११-२०२०). श्री.सदाशिव खोत, श्री.गोपिचंद पडळकर : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ताळेबंदीच्या काळात कामावर उपस्थित राहू न शकलेल्या दिव्यांग कर्मचाऱ्यांना वेतन अदा न करण्याचा मुंबई महापालिकेने घेतलेला निर्णय बेकायदेशीर असल्यामुळे मा.उच्च न्यायालयाने महापालिकेला दिव्यांग कर्मचाऱ्यांना २ आठवड्याच्या आत वेतन अदा करण्याचे आदेश दिनांक २८ ऑक्टोबर, २०२० रोजी वा त्यासुमारास दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कर्मचाऱ्यांना त्यांचे वेतन अदा न करण्यात आल्यामुळे उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार मुंबई महापालिकेने दिव्यांग कर्मचाऱ्यांचे वेतन अदा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.एकनाथ शिंदे (०७-१२-२०२०) : (१) राज्यात टाळेबंदीच्या काळात दिव्यांग कर्मचाऱ्यांना त्यांच्या खाती असलेली अनुज्ञेय रजा मंजूर करून कर्तव्यावर उपस्थित राहण्यापासून सूट देण्यात आली होती.

सदर अनुपस्थितीच्या कालावधीची भर पगारी विशेष रजा मंजूर करण्याबाबत “नॅब” या संस्थेकडून मा.उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल करण्यात आली होती.

सदर याचिकेच्या अनुषंगाने मा.उच्च न्यायालयाने दिनांक २८/१०/२०२० रोजी टाळेबंदीच्या कालावधीमध्ये कर्तव्यावर हजर राहण्यापासून सूट देण्यात आलेल्या सर्व दिव्यांग कर्मचाऱ्यांच्या अनुपस्थितीच्या कालावधीचे वेतन दोन समान हप्त्यात, लवकरात लवकर म्हणजेच पहिला हप्ता दिवाळीपूर्वी व दुसरा हप्ता पहिल्या हप्त्याचे अधिदान झाल्यापासून ४५ दिवसांच्या आत करावयाचे आदेश दिले आहेत.

(२) व (३) मा.उच्च न्यायालयाच्या आदेशाच्या अनुषंगाने, टाळेबंदीच्या कालावधीत अनुपस्थित असलेल्या व त्यामुळे वेतन कापण्यात आलेल्या १८७ दिव्यांग कर्मचाऱ्यांपैकी रुपये १५,०००/- पेक्षा कमी वेतन कापण्यात आलेल्या दिव्यांग कर्मचाऱ्यांच्या खाती प्रत्यक्षात देय असलेली रक्कम व रुपये १५,०००/- पेक्षा अधिक वेतन कापण्यात आलेल्या दिव्यांग कर्मचाऱ्यांच्या खाती रुपये १५,०००/- इतकी रक्कम दिवाळीपूर्वी जमा करण्यात आली आहे.

तसेच उर्वरीत रकमेचे अधिदान डिसेंबर, २०२० च्या वेतनामध्ये करण्यात येणार आहे.

पंढरपूर (जि.सोलापूर) येथे बनावट खाद्यतेल विक्री करणाऱ्यांविरुध्द कारवाई करण्याबाबत

(४४) ६१०३ (०१-१२-२०२०). श्री.प्रशांत परिचारक, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रसाद लाड : सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंढरपूर (जि.सोलापूर) येथे बनावट खाद्यतेल विक्री करणाऱ्या व्यापाऱ्यांचे प्रमाण वाढल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित व्यापारी सदरचे बनावट तेल मूळ बाजार किंमतीपेक्षा रुपये १० ते १२ कमी दराने विकत असल्याचेही निदर्शनास आले असून यासंदर्भात स्थानिक अन्न व औषध प्रशासन सोयीस्कररित्या दुर्लक्ष करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन नागरिकांच्या आरोग्याच्या हिताकरीता व्यापारी तथा अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ.राजेंद्र शिंगणे (११-१२-२०२०) : (१) हे खरे नाही. तथापि, खाद्यतेलाच्या दर्जाबाबत संशय असल्याने दिनांक ०४/११/२०२० रोजी पंढरपूर येथे धाड टाकून खाद्यतेलाचा संशयित साठा जप्त करण्यात आलेला आहे व खाद्यतेलाचे २ नमुने विश्लेषणासाठी घेण्यात आले असून सदरचे विश्लेषण अहवाल अद्याप प्रलंबित आहेत.

(२) हे खरे नाही.

(३) दिनांक ०४/११/२०२० रोजी विश्लेषणास घेतलेले नमुने विश्लेषणास प्रयोगशाळेत पाठविले असून विश्लेषण अहवाल प्राप्त होताच अन्न सुरक्षा व मानदे कायदा २००६ अंतर्गत संबंधिताविरुध्द आवश्यकतेनुसार कारवाई करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

रायगड जिल्हा परिषदेंतर्गत सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांची निवृत्तीवेतन व इतर प्रदाने विहित मुदतीत करण्याबाबत

(४५) ६१२१ (२३-११-२०२०). डॉ.परिणय फुके, श्री.निलय नाईक : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्हा परिषदेंतर्गत सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांना दरमहा १ तारखेला बँक खात्यामध्ये निवृत्तीवेतन जमा होत नसल्याची तक्रार सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनी रायगड जिल्हा परिषदेकडे माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माहे मार्च, २०२० ते ऑक्टोबर, २०२० अखरेपर्यंत रायगड जिल्हा परिषदेने सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे निवृत्तीवेतन जवळपास महिन्याच्या १५ तारखेपर्यंत उशिरा जमा केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रायगड जिल्हा परिषदेतून सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांना निवृत्तीवेतन, उपदान, भविष्यनिर्वाह निधी व रजा रोखीची प्रकरणे १ वर्षाचा कालावधी होवूनही जिल्हा परिषदेच्या अर्थ विभागाकडून प्रदान करण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनी देयके त्यांना विहित मुदतीत प्रदान न करणाऱ्या बेजबाबदार मुख्य लेखा अधिकारी, वित्त अधिकारी व इतर संबंधित अधिकरी/कर्मचारी यांचेवर कारवाई करुन सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांची प्रदाने नियमित वेळेवर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.हसन मुश्रीफ (११-१२-२०२०) : (१) होय.
(२) होय.
(३) नाही.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

कामतघर, भिवंडी शहर येथे बनावट औषधांची विक्री होत असल्याबाबत

(४६) ६१९६ (२०-११-२०२०). श्री.गोपिचंद पडळकर, श्री.सदाशिव खोत : सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कामतघर, भिवंडी शहर येथे एका औषध दुकानदाराने दिल्ली शहराचे विषारी बनावट औषध विक्री केल्याची तक्रार एका रुग्णाने आयुक्त, अन्न औषध प्रशासन, मुंबई यांना दिनांक २८ सप्टेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, भिवंडी शहरात अनेक औषध विक्रेते स्वतःच्या फायद्यासाठी जास्त कमिशन कमावण्याच्या हेतूने भीम विषारीयुक्त औषधे राजरोसपणे विकून त्यांच्या कमिशनमधून संबंधित अन्न व औषध प्रशासन अधिकाऱ्यांना हफ्ते देत असल्याची चर्चा स्थानिकांमध्ये होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, जन औषध विक्रेते व मूळ औषध विक्रेते एका परवान्यावर २ औषधाचे दुकान चालवीत असून प्रशासन मात्र त्याकडे दुर्लक्ष करीत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ.राजेंद्र शिंगणे (७-१२-२०२०) : (१) हे खरे आहे.
(२) व (३) खरे नाही.
(४) याप्रकरणी प्राप्त तक्रारीतील नमुद औषध विक्रेत्याकडे तपासणी करण्यात आली सदर दुकानात उपलब्ध असलेल्या खोकल्याच्या औषधांच्या साठ्यातून तीन औषधांचे नमुने घेण्यात येवून चाचणी व विश्लेषणांसाठी औषध नियंत्रण प्रयोगशाळा, मुंबई येथे पाठविण्यात आले असून, चाचणी अहवाल अद्याप प्रलंबित आहेत. तसेच सदर पेढ्याच्या तपासणीवेळी आढळून आलेल्या दोषांचे अनुषंगे कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली असून पुढील तपास व कारवाई सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

ठाणे जिल्ह्यातील कुपोषणाचे प्रमाण कमी करण्याबाबत

(४७) ६२०५ (२३-११-२०२०). श्री.नागोराव गाणार, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.गिरीशचंद्र व्यास, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत : सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे जिल्ह्यात माहे ऑगस्ट, २०२० अखेर १३३ तीव्र आणि १३०५ मध्यम कुपोषित बालके आढळल्याची बाब माहे सप्टेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कुपोषणाचे प्रमाण कमी करण्यासाठी सर्व शासकीय यंत्रणा प्रयत्न करीत असून तसेच विशेष योजना राबविल्या जात असतानाही कुपोषणाचे प्रमाण वाढत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ठाणे जिल्ह्यात मागील तीन वर्षापासून सप्टेंबर महिना पोषण महिना (कुपोषण मुक्त भारत) म्हणून साजरा केला जात असतानाही कुपोषणात वाढ होण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने ठाणे जिल्ह्यातील कुपोषणाचे प्रमाण कमी करण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) (१०-१२-२०२०) : (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.

ठाणे जिल्ह्याच्या मासिक प्रगती अहवालावरुन मागील एका वर्षात तीव्र कुपोषित बालकांच्या संख्येत सुधारणा झाली असून ऑक्टोबर, २०२० अखेर सॅम बालके ८३, मॅम बालके १०३५ तर मध्यम कुपोषित बालके २४१० एवढी आहे.

कुपोषणाचे प्रमाण कमी करण्याकरीता महिला व बालविकास विभाग, सार्वजनिक आरोग्य विभाग तसेच इतर शासकीय यंत्रणांमार्फत कुपोषणमुक्तीच्या विविध योजना राबविण्यात येत आहेत.
(३) व (४) माहे सप्टेंबर, २०२० हा संपूर्ण पोषण महिना (माहे) म्हणून विविध विभागांच्या समन्वयाने कार्यक्रम व उपक्रमांसह साजरा करण्यात आला. या अंतर्गत अंगणवाडीस्तरावर कुपोषण कमी करण्याच्या अनुषंगाने विविध उद्दीष्ट साध्य करणेबाबत प्राधान्य देण्यात आले.

कुपोषणाचे प्रमाण कमी करण्याकरीता एकात्मिक बालविकास सेवा योजनांतर्गत खालील उपाययोजना करण्यात येतात :-

१. ६ महिने ते ३ वर्ष या वयोगटातील बालक, गरोदर स्त्रिया, स्तनदा माता यांना घरपोच आहार नियमितपणे देण्यात येतो.
२. कोविड-१९ च्या प्रादुर्भावामुळे सध्या ३ ते ६ वर्ष या वयोगटातील लाभार्थ्यांना गरम ताजा आहाराऐवजी घरपोच आहार अंतर्गत कच्चे धान्य व किराणा मालाचा पुरवठा करण्यात येत आहे.

३. आदिवासी भागात अमृत आहार योजनेंतर्गत गरोदर स्त्रिया व स्तनदा माता यांना चौरस आहार देण्यात येतो व ६ महिने ते ६ वर्ष वयोगटातील बालकांना आठवड्यातून ४ वेळा अंडी व केळी देण्यात येतात.

४. राज्यातील सॅम बालकांकरीता ग्राम बालविकास केंद्र सुरु करण्यात आली असून त्यामध्ये सॅम बालकांना सर्वसाधारण श्रेणीत आणण्याकरीता सॅम बालकांची अंगणवाडी सेविका, आशा वर्कर यांचेमार्फत स्क्रिनिंग केल्यानंतर वैद्यकीय अधिकारी यांनी प्रमाणित केल्यावर ज्या सॅम बालकांना कोणतेही दुर्धर आजार नाहीत अशा बालकांना ग्राम बालविकास केंद्रामध्ये दाखल करण्यात येते. येथे सॅम बालकांना औषधोपचार देण्यात येवून वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या सल्ल्यानुसार ठरवून दिलेल्या प्रमाणात EDNF देण्यात येतो. EDNF हे मायक्रोन्युट्रियन्ट फोर्टीफाईड शास्त्रोक्त पध्दतीने तयार केलेले फूड आहे.

५. ज्या बालकांना वैद्यकीय सेवेची आवश्यकता आहे त्यांना Nutrition Rehabilitation Centre मध्ये दाखल करण्यात येवून त्यांच्यावर वैद्यकीय उपचार करण्यात येतात.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

समाधान सहकारी गृहनिर्माण संस्था, मुंबई येथील विकासकाने गैरव्यवहार केल्याबाबत

(४८) ६२८७ (२०-११-२०२०). श्री.सदाशिव खोत : सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) समाधान (झो.पु.प्रा.) सहकारी गृहनिर्माण संस्था दादर (प), मुंबई येथे विकासक मे.रेर्नसन कन्स्ट्रक्शन यांनी झो.पु.प्रा. परिपत्रक क्रमांक ५३ चा लाभ/सूट घेऊन एल.ओ.आय. मध्ये जास्त प्रकल्पग्रस्त सदनिका निर्माण करुन सदर प्रकल्पग्रस्त सदनिका ह्या महापालिकेला उपलब्ध न करता त्या

विकासकांच्या साई दर्शन सोसायटी येथे स्थलांतरित केल्या व तेथील विक्री विकास क्षेत्र झो.पु.प्रा. व महानगरपालिका अधिकाऱ्यांशी संगनमत करून स्थलांतरित करून घेतल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महापालिकेचे करोडो रुपयाचे अतिरीक्त विकास क्षेत्र व प्रकल्पग्रस्त सदनिका गिळंकृत केल्यामुळे उक्त प्रकरणी सखोल चौकशी करून विकासकांच्या विक्री सदनिकांच्या इमारतीचे भोगवटा प्रमाणपत्र (ओ.सी.) रद्द करून त्यांच्याकडून गिळंकृत विक्री क्षेत्राचे दंड घेण्याबाबत व एल.ओ.आय. मध्ये फेरफार करणाऱ्या झो.पु.प्रा. अधिकारी व महानगरपालिका अधिकारी यांचेवर कारवाई करण्याबाबत दिनांक २७ ऑक्टोबर, २०२० रोजी मा.नगर विकास मंत्री व मा.गृहनिर्माण मंत्री यांचेकडे तक्रार दाखल करण्यात आल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त गैरव्यवहारामध्ये सहभागी असलेले श्री.विकास खर्चे हे मुंबई महानगरपालिका विभागातील शासकीय अधिकारी होते आणि त्यांनी अनेक शासकीय जमिनींवर इमारती बांधून त्यांची विक्री केल्याप्रकरणी त्यांची करोडो रुपयांची संपत्ती व बेकायदेशीर व्यवहाराची सखोल चौकशी व्हावी अशी मागणी देखील करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित विकासकाने झो.पु.प्रा. विकास योजनेंतर्गत संबंधित शासकीय अधिकाऱ्यांना हाताशी धरून सदनिकाधारक व शासनाची फसवणूक केल्याप्रकरणी दोषींवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.जितेंद्र आव्हाड (०२-१२-२०२०) : (१) हे खरे नाही.

सदर योजनेंतर्गत विकासकास कोणतेही वाढीव विक्री घटकाचे क्षेत्र देण्यात आलेले नाही. सदर योजनेचे साईदर्शन सह. गृहनिर्माण संस्थेच्या योजनेसोबत एकत्रिकरणास (Clubbing) तत्कालीन विकास नियंत्रण नियमावलीतील नियम क्र.३३(१०) च्या परिशिष्ट-४ मधील कलम ७.८ च्या तरतुदीनुसार परवानगी देण्यात आलेली आहे. त्यानुसार PAP सदनिकांचे साईदर्शन सह. गृहनिर्माण संस्थेच्या योजनेमध्ये स्थलांतरण करण्यात आले आहे, ही वस्तुस्थिती आहे.

(२) याबाबत श्री.योगेश सुभाष खेमकर यांनी मा.गृहनिर्माण मंत्री व मा.नगर विकास मंत्री यांना संबोधित केलेल्या दिनांक २६/१०/२०२० रोजीच्या तक्रार पत्राची प्रत दिनांक २७/१०/२०२० रोजी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणास प्राप्त झाली आहे. सदर तक्रारपत्रामध्ये उपस्थित केलेल्या मुद्दयांमध्ये कोणतेही तथ्य नसल्याचे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने कळविले आहे.

(३) वरीलप्रमाणे वस्तुस्थिती असल्यामुळे चौकशी करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

बाबुलतारा नांद्रा, वाघाडी व वाघाडीवाडी (ता.परतूर) या गावातील रस्ते व पुलाचे काम प्रलंबित असल्याबाबत

(४९) ६२९० (२०-११-२०२०). श्री.सदाशिव खोत, श्री.गोपिचंद पडळकर : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बाबुलतारा नांद्रा, वाघाडी व वाघाडीवाडी (ता.परतूर) या गावात जिल्हामार्गाचे काम पूर्ण झाले असून केवळ चार किलोमीटर अंतर रस्त्याचे व पुलाचे काम प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर चारही गावांचा संपर्क दुधना प्रकल्पात साचलेल्या पाण्यामुळे तुटल्याने उक्त ठिकाणी जाण्याकरीता ३५ कि.मी. अंतर वळून वाटूर मार्गे परतूरला यावे लागत असल्याचे माहे नोव्हेंबर, २०२० च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी नागरिक संताप व्यक्त करीत असल्यामुळे सदर रस्त्याचे व पुलाचे काम तात्काळ पूर्ण करण्याबाबत ग्रामस्थांकडून वारंवार मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.अशोकराव चव्हाण (१०-१२-२०२०) : (१) हे अंशत: खरे आहे.

प्रराामा ०२ ते बाबुलतारा गावास जोडणाऱ्या ४ कि.मी. रस्त्याचे (प्रजिमा-२९) काम पूर्ण झालेले आहे.

बाबुलतारा-अंबा-परतूर रस्त्यापैकी अंबा ते परतूर डांबरी रस्ता पृष्ठभागाने जोडली आहेत. तथापि, बाबुलतारा ते अंबा रस्ता (अंदाजे २.२० कि.मी.) अस्तित्वात नसलेली लांबी व त्याच रस्त्यावर दुधना नदीवर पुलाचे काम निधी, निकष व मंजुरीच्या अधीन राहून हाती घेण्याचे नियोजन राहील.

(२) होय, हे खरे आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) व (५) प्रश्नाधीन रस्ता व पुलबांधणीचे काम निकष, मंजूरी व निधी उपलब्धतेच्या अधीन राहून हाती घेण्याचे नियोजन राहील.

सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अखत्यारीतील काही रुग्णालये पीपीपी तत्त्वावर चालविण्याच्या प्रस्तावाबाबत

(५०) २०३३७ (११-०८-२०१६). श्री.शरद रणपिसे : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अखत्यारीतील काही रुग्णालये पीपीपी तत्त्वावर चालविण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत निर्णय घेण्यात आला व त्याचे स्वरुप काय आहे, उक्त प्रस्तावावर निर्णय घेण्यात आला नसल्यास शासनाच्या अखत्यारीतील रुग्णालये पीपीपी तत्वावर चालविण्यासाठी देण्याची कारणे काय आहेत व शासनाकडे त्यावर कशाप्रकारे नियंत्रण असणार आहे,

(३) तसेच प्रस्तावित प्रस्तावानुसार पीपीपी तत्त्वासाठी कोणत्या सोयी सुविधा उपलब्ध करण्यात येणार आहेत ?

श्री.राजेश टोपे (८-१२-२०२०) : (१) अंशत: खरे आहे.

(२) सप्टेंबर, १९९३ मध्ये लातूर व उस्मानाबाद या जिल्ह्यात झालेल्या भुकंपात अनेक घरेदारे, तसेच, सार्वजनिक आरोग्य विभागाच्या ताब्यात असलेल्या अनेक इमारती उध्वस्त झाल्या होत्या. या भागात शासनाच्यावतीने

करण्यात आलेल्या पुनर्वसन कार्यात अनेक व्यक्तींनी व स्वयंसेवी संस्थांनी सहकार्य केले. सहकार्याचा एक भाग म्हणून उस्मानाबाद जिल्ह्यात सास्तूर येथे मेसर्स प्राईड इंडिया या संस्थेने अन्य संस्थांकडून मदत प्राप्त करुन घेऊन ग्रामीण रुग्णालयासाठी इमारत बांधली होती. सास्तुर येथील नागरीकांना आरोग्य सेवा मिळावी म्हणून दिनांक २६/०६/२००० च्या शासन निर्णयान्वये, मेसर्स प्राईड इंडिया या संस्थेस त्यांनी बांधलेल्या इमारतीमध्ये ग्रामीण रुग्णालय पीपीपी तत्वावर चालविण्यास शासन निर्णयातील अटी व शर्तीवर मान्यता देण्यात आली आहे. तसेच ग्रामीण रुग्णालय महाबळेश्वर व तळदेव आणि तापोळा या दुर्गम भागातील प्राथमिक आरोग्य केंद्रे येथील पदे रिक्त रहात असल्याने आणि तेथील नागरीकांना उत्तम आरोग्य सुविधा देण्यासाठी व सदर रुग्णालयांच्या परिसरातील नागरिकांचे हित लक्षात घेवून सार्वजनिक आरोग्य विभागाच्या दिनांक २७/०३/२०१८ शासन निर्णयान्वये महाबळेश्वर येथील ग्रामीण रुग्णालय आणि तळदेव व तापोळा ही दोन प्राथमिक आरोग्य केंद्रे बेलएअर हॉस्पिटल, पाचगणी या संस्थेस प्रयोगिक तत्वावर १ वर्षाकरीता शासन निर्णयामध्ये नमूद अटी व शर्तीवर चालविण्यास परवानगी देण्यात आली आहे.

दिनांक २४/०१/२०१८ च्या शासन निर्णयान्वये, राज्यातील ३०० खाटांची रुग्णालये व त्या अंतर्गत शासकीय वैद्यकीय महाविद्यालये सुरु करुन सार्वजनिक-खाजगी भागीदारी (पीपीपी) तत्वावर खाजगी संस्थेस चालविण्यास देण्याबाबत शासनाचे धोरण निश्चित करण्याकरीता समिती गठीत करण्यात आली आहे. समितीचा अहवाल अप्राप्त आहे.

(३) याबाबत शासनाने अद्याप धोरणात्मक निर्णय घेतलेला नाही.

विधान भवन :
मुंबई.

श्री.राजेंद्र भागवत
सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद.

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.